
# एका संघर्षाची गाथा

## मराठवाड्यातील पोराची कथा



अशोक घुले

# एका संघर्षाची गाथा...
# मराठवाड्यातील पोराची कथा

अशोक पांडुरंग घुले

शारदा प्रकाशन

एका संघर्षाची गाथा...
मराठवाड्यातील पोराची कथा


**अशोक पांडुरंग घुले**
**३०३, कामतघर, मराठी शाळा क्र.४२ जवळ,**
**ता. भिवंडी, जि. ठाणे - ४२१३०५**
**भ्रमणध्वनी : ९४२११४१३७५**
Email - ashok.ghule@gmail.com



**प्रकाशक / मुद्रक**
शारदा प्रकाशन
प्रा. संतोष राणे
ओम साईप्रसाद शिवाजीनगर, बी केबीन,
नौपाडा, ठाणे (प) - ४००६०२.
भ्रमणध्वनी - ९८२०१७६९३४
Email - sharadaprakashan@gmail.com

**मुखपृष्ठ**
महेन्द्र गुडेकर

**अक्षरजुळणी**
स्वामी समर्थ क्रिएशन

**प्रथमावृत्ती**
२८ डिसेंबर २०१८

**मूल्य**
१०१/- रुपये

प्रिय आण्णा ...

तुम्ही केलेल्या आयुष्यभराच्या संघर्षामुळे आम्ही सर्व यशाची पहाट पाहू शकलो ...

# लेखकाचे मनोगत

कुटुंबातील प्रमुख व्यक्तीच्या जाण्याने त्या कुटुंबावर मोठा आघात होत असतो. हे मानवी जीवनातील कटूसत्य आहे, हे सर्वांना माहित असते. परंतु तो प्रसंग अचानकपणे आल्यावर प्रत्येकाची मती गुंग होते. हा आघात सहन करण्याची शक्ती मिळणे गरजेचे आहे. त्यातच माझ्या ४३ वर्षाच्या जीवनात असा प्रसंग पहिलाच, अशा प्रसंगाला सामोरे जाणे अतिशय कठीण आहे. त्यातच कुंटुंबातील मोठ्या मुलाची परिस्थिती अतिशय केविलवाणी होते. त्याला इतर सदस्याची काळजी घ्यावी लागते, त्यात त्याला स्वतःकडे पाहण्यास वेळ नसतो. मनातील दुःख मनातच राहते, ते व्यक्त करण्याची मुभा त्याला नसते. कारण त्याचा दूरगामी परिणाम आपल्या जवळच्या सदस्यावर होणार असतो याची भिती त्याच्या मनात असते. हे दुःखाचे शल्य त्याच्या मानसिक, शारिरीक स्वास्थ्यावर परिणाम करीत असते. हे पुस्तक लिहित असताना आपल्या मनातील भावना लिहिल्याने मनाला होणारी वेदना कमी करण्याचा हा एक प्रयत्न आहे.

'एक संघर्षाची गाथा... मराठवाड्यातील पोराची कथा' हे पुस्तक लिहिण्यामागील हेतू हा आहे की, आमचे आण्णा म्हणजे आमच्यासाठी असामान्य व्यक्तिमत्त्व होते. हे त्यांचे असामान्यत्व इतरांना माहित व्हावे. त्याचबरोबर त्यांच्या संघर्षाची कल्पना आमच्या पुढील पिढीला मिळावी. तसेच त्यांचा वाढ व विकास होत असताना तत्कालीन सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीचा झालेल्या परिणामाचा परिपाक म्हणजे आण्णांच्या जीवन चरीताचा उल्लेख करता येईल. हे पुस्तक लिहित असताना असे वाटले की, आपणांस त्यांना अनेक बाबी विचारायाच्या राहून गेल्या, त्यांच्याशी मनसोक्त गप्पा मारायच्या राहिल्या, त्यांच्याविषयी अनेक बाबी जाणून घेता आल्या नाहीत. त्यांच्यासोबत फिरण्याचे राहून गेले. याची खंत नेहमीच राहील. त्यांच्याकडे पाहता ते इतक्या लवकर सोडून जातील असे वाटले नव्हते. त्यामुळे या सर्वबाबी आपणांस करता येतील असे वाटत

होते. परंतु नियतीच्या मनातील आपणांस जाणता येत नाही. त्यामुळे आपल्या आप्तस्वकीय, मित्रासोबत आलेला प्रत्येक क्षण आनंदाने घालविणे गरजेचे आहे. अन्यथा कायमस्वरूपी त्या बाबी न केल्याचे दुःख उरी बाळगण्याची वेळ येते.

हे पुस्तक लिहिण्यास मला माझी बा (आई) ताराबाई पांडुरंग घुले हिने सतत प्रोत्साहीत केले. या पुस्तकाचे हस्तलिखित तिला वाचून दाखवित असताना तिने अनेक प्रसंग सांगितल्याने ते मला लिहिता आले. या कामी माझी अर्धांगिनी अंजली हिने सतत प्रोत्साहन देऊन लेखनासाठी मनोबल वाढविले. कु. सुमेध व प्रियंका यांनी हस्तलिखित वाचनास मदत केली. तसेच शिवाजी मामा व शारदा मामी यांनी मनोबल वाढविले. सौ. अस्मिता राजेश चौधरी हिने लिखाणासाठी मदत केली; त्याचबरोबर सुधारणा सुचविल्या. श्री. अजय अनंत पाटील यांच्या सोबत पुस्तकाचे लिखाण कसे करता येईल याबाबत झालेली चर्चा उपयुक्त ठरली. तसेच डॉ. अशोक हेमा फर्डे, उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ, श्री कृष्णा पराड, उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ डॉ. एम. एस. शेख, सहाय्यक कुलसचिव मुंबई विद्यापीठ यांना सतत प्रोत्साहित केले. मा. डॉ. राजन वेळूकर, माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांनी पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याची विनंती केल्यानंतर तात्काळ मान्य केली. सौ. समिधा पाटील (गंधे) यांनी मुद्रित शोधनाच्या चुका दुरुस्त करून दिल्या. आण्णांच्या आयुष्यात अनेक व्यक्ती आल्या होत्या. परंतु त्यांच्या विषयी सर्वांची माहिती मला नसल्याने त्यांचा उल्लेख करता आलेला नाही. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. शारदा प्रकाशन यांचे प्रा. संतोष राणे यांनी पुस्तकाची छपाईची व प्रकाशनाची जबाबदारी स्विकारली. तसेच या पुस्तकाच्या निर्मितीस कळत, नकळतपणे मदत केलेल्या त्या सर्वांचे आभार.

**अशोक पांडुरंग घुले**

# दोन शब्द

एखाद्या असामान्य व्यक्तिमत्त्वाविषयी लिहिण्याची, त्यांच्या विषयीचे वाचन करण्याची ओढ, उत्सुकता सर्वांमध्ये नेहमीच असते. परंतु जन्माला येणाऱ्या सामान्य व्यक्तीच्या जीवनात संघर्ष, स्पर्धा, सुख-दुःखे ही येत नाहीत का? तर येतात; परंतु त्यांचे स्वरुप हे आपल्या अवतीभोवती असणाऱ्या विश्वाशी संबंधीत असते आणि अशाच एका सामान्य व्यक्तिमत्वाचे व्यक्तीरेखाटन करण्याचा प्रयत्न श्री. अशोक घुले यांनी आपल्या 'एक संघर्षाची गाथा... मराठवाड्यातील पोराची कथा' या कथनातून 'आण्णा' विषयी मांडण्याचा केला आहे आणि तो अगदी वाखाणण्याजोगा आहे.

'आण्णा' असे उच्चारतांना माझ्या डोळ्यांसमोर त्यांचा एक आदरार्थी, निस्वार्थी आणि जणू स्वागतासाठी सदैव तत्पर असलेला, जिवाची घालमेल झालेला प्रसन्न चेहरा उभा राहतो. त्यांच्या स्वभावातला सर्वात चांगला गुण म्हणजे त्यांच्या बोलण्यात कधीच एकेरीपणा नव्हता. सर्वांशी आदराने बोलणे हा त्यांचा मूळ स्वभाव. असे आण्णा ज्यांना स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी तत्कालिन सामाजिक परिस्थितीशी खूप संघर्ष करावा लागला. तरीदेखील या परीस्थितीवर मात करून आपली कौटुंबिक जबाबदारी देखील तितक्याच सद्सद्विवेक बुद्धीने पार पाडली. दोन्ही मुलांची वैचारिक योग्यतेनुसार त्यांना शिक्षण आणि स्वावलंबी होण्यासाठी प्रोत्साहित केले. त्याचेच परिणाम म्हणून एक आदर्श मुलगा, एक आदर्श पती आणि एक आदर्श पिता म्हणून या कसोटीला उतरण्यासाठी अटोकाट प्रयत्न करणारा त्यांचा सुपुत्र अशोक.

या कथनात आण्णांचे पूर्ण सामाजिक, कौटुंबिक जीवनपट उभे करण्याचा एका छोटासा प्रयत्न केला आहे. त्यांचा कमी लाभलेला सहवास, त्यांच्या

भविष्यातील असलेल्या इच्छा-आकांक्षा या उणिवा तर कधीच भरून निघणार नाही. परंतु या कथनांतून मानसिक समाधान मिळावे, त्यासाठी केलेला एक श्री. अशोक घुले यांचा छोटासा प्रयत्न.

**सौ. अस्मिता राजेश चौधरी**

# एका संघर्षाची गाथा...
## मराठवाड्यातील पोराची कथा

मराठवाड्यातील धाराशिव (उस्मानाबाद) जिल्हा हा एक दुष्काळग्रस्त भागच आहे. सोलापूर - बीड राष्ट्रीय महामार्ग झाल्याने येथे दळणवळणाची चांगली सोय निर्माण झाली. लोकांना शासनाने वाहतुकीची सोय निर्माण केल्याने, शहराशी संपर्क येत होता त्यामुळे स्वातंत्र्याने मिळालेली फळे चाखता येत होती असे म्हणता येईल. पूर्वीच्या भुम तालुक्यातील व आताच्या वाशी तालुक्यातील ''रूई'' हे आमचे मूळ गांव. ३०० ते ४०० लोकसंख्या असणारे गांव. मुख्य रस्त्यापासून २ कि.मी. अंतरावरील गाव. या गावातील बहुतांशी लोक उदरनिर्वाहासाठी शेती हा व्यवसाय करीत. येथील शेती पूर्णपणे पावसावर अवंलबून असल्याने येथील लोक शेतीतील उत्पादनावर अवलंबून असत. त्यात देखील ७०-७५ सेंमी इतकेच वार्षिक पर्जन्यमान असल्याने पाऊस फारसा होत नसे . पाणी साठवून ठेवण्याची कोणतीही व्यवस्था गावात नव्हती, त्यामुळे निसर्गाच्या कृपेवरच लोकांना रहावे लागत होते. निजामाचे राज्य असल्याने लोककल्याणकारी योजनाची अपेक्षा ठेवण्यात अर्थ नव्हता.मातीची पाणी धारणक्षमता चांगली असल्याने पीक चांगले येत असे. लोक गुण्यागोविंदाने राहत होते. मारूतीचा पार व मन्मत स्वामीचा (गोसाव्याचा) मठ ही दोन ठिकाणे लोकांनी एकत्रित जमण्याची ठिकाणे उल्लेखता येतील. मन्मत स्वामीचा (गोसाव्याचा) मठातून भुयारीमार्गे फरम्यावर (पिरावार) निघता येते असे जुने जाणकार लोक सांगतात. रजाकाराचे किंवा निजामाचे आक्रमण झाल्यास सुरक्षित बाहेर पडण्यासाठी ही सोय निर्माण केलेली असावी. पार हा गावातील एकात्मतेचा तो प्रतिक होता. सर्व लोकांनी एकत्रित श्रमदानातून तो बांधला होता. त्याचे बांधकाम पूर्ण चिऱ्याचे आहे. रात्री लोक जेवणानंतर गप्पाटप्पांसाठी येथे जमत. पाराच्या बाजूला जूना मोठा पिंपळाचा वृक्ष आहे. गावातील अनेक चांगल्या वाईट घटनांचा हा जसा साक्षीदारच आहे असे त्याच्याकडे पाहिल्यास

आपणांस वाटते. या झाडावर पक्षी विसाव्यास येत. हा वृक्ष आपली शीतल छाया सर्वांना देत असे. कोणत्याही प्रकारचा भेदभाव, जातिभेद तो आपली छाया देतांना ठेवत नव्हता. पिण्याच्या पाण्यासाठी मोठा आड गावकऱ्यांनी एकत्रित येऊन बांधला. या आडातून लोकांना पाणी पुरवठा केला जातो. अलीकडच्या काळात कुपनलिकांची सोय झालेली. सध्या उन्हाळ्यात गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा जिल्हा परिषदेमार्फत केला जात आहे. त्याकाळात गावाची तहान भागविण्याची क्षमता आडात होती. जुन्या जलस्त्रोतांचे संवर्धन करणे आवश्यक असताना त्या कडे स्थानिक नेतृत्वाचे दुर्लक्ष झाल्याने पाणी पुरवठ्यासाठी टँकरची वेळ आली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. पारगांवला जाताना पांदीतून जावे लागत असे, अशा काळात विसाव्याचे हमखास ठिकाण म्हणून ''भोन्याई''चा उल्लेख करता येईल. या ठिकाणी थांबल्याने आपल्या पाठीमागे एक अनभिज्ञ शक्ती उभी आहे असे वाटत असे, जिचा आधार त्यांना या परिसरात राहताना संकटाशी सामना करताना होईल असा विश्वास होता. गावाजवळील थोडे मोठे गाव पारगांव असल्याने लोकांना आपला आठवड्याचा बाजारहाट करण्यासाठी येथेच जावे लागत असे. स्वातंत्र्यापूर्वी हा भाग निजामाच्या राजवटीखाली असल्याने येथे विकासाच्या खानाखुणा अभावानेच दिसत होत्या. येथील जीवनशैली सतत भितीखाली, दबावात, दडपणाखाली राहण्याची होती. महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना मोठ्या प्रमाणांवर होती. त्यामूळे त्यांचा कल घरात राहण्यावर अधिक होता. लोकांवर कधी निजाम किंवा रजाकार यांच्याकडून आक्रमण होण्याची भितीची तलवार डोक्यावर सतत टांगती होती. शिक्षण घेण्याची वृती लोकांमध्ये दिसून येत नव्हती. जवळपास उद्योगधंदे नसल्याने केवळ शेती किंवा शेतमजुरी हेच पर्याय लोकांकडे उपलब्ध होते. शेतीस जोडधंदा करावा अशी परिस्थिती नव्हती. त्यात देखील शेती ही पावसावर अवलंबून असल्याने पावसाळ्यात (अगाद) व काही प्रमाणात हिवाळ्यात (रब्बीत) लोक कामात असत इतर काळात त्यांना काम उपलब्ध नसे. परिणामी बेकारी मोठ्या प्रमाणावर ह्या परिसरात

होती.लोकांमध्ये आळशी गुणांची वाढ मोठ्या प्रमाणावर झालेली होती. हिच जीवनशैली लोकांनी वर्षानुवर्ष अंगीकारली होती. मनुष्यबळाचा पूर्ण वापर होत नसल्याने लोक शेतीच्या कामाशिवाय इतर कोणताही व्यवसाय नसल्याने व्यसनाकडे वळत असत. दारू पिणे, बिस्कीटाच्या पुड्यावर जुगार खेळणे, पारावर जाऊन हनुमानाच्या मूर्तीमागे ओढून टाकलेल्या बिड्या ओढणे; विशेषतः लहान मुले धुम्रपानाकडे अशा प्रकारे ओढली जात होती, तंबाखू खाणे, चिलीम (गांजा) ओढणे इ. व्यसनाकडे येथील मुले, तरुण पिढी ओढली नाही गेली तर नवल. आरोग्याच्या सुविधाचा अभाव असल्याने अकाली मृत्यूचे प्रमाण अधिक होते. आजदेखील महाराष्ट्राच्या इतर भागाशी तुलना केली असता समाधानकारक आहे असे म्हणणे धाडसाचे होईल, परंतु सध्याच्या स्थितीत सुधारणा निश्चित दिसून येते. अर्थात सर्वच बाबी वाईटच होत्या असे नाही, लोक तालमीत देखील जात असत.शिक्षणाचा अभाव असल्याने लोक सकारात्मक बाबींचा विचार करण्यास प्रेरित होत नव्हते, कारण शिक्षणाने व्यक्तीच्या विचारांना चालना देण्यास हातभार लागतो.

या गावात बप्पासाहेब यशवंतराव घुले (दादा) या शेतकरी युवकाशी कु. सुभद्रा हरीभाऊ खोसे (इजोरा) या युवतीशी सन १९४०-४२ च्या सुमारास विवाह झाला. तिला चार बहिणी होत्या, त्या शेलगांव, पालशिंगन व गोलंगडी या गावात दिल्या होत्या. बप्पासाहेब व सुभद्रा यांच्या पोटी यांना १२ डिसेंबर १९४४ रोजी पांडुरंग घुले (आण्णा) यांचा जन्म झाला. घरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. मुलाच्या चुलत्याचा (तात्यासाहेब) पांडुरंगवर विशेष जीव होता. आजी रंगूबाईचा पांडुरंग जीव की प्राण झाला. ती आण्णाला "पांडुरंग" अशी हाक मारायाची. ज्येष्ठ पुत्राचा पहिला मुलगा असल्याने तिचा नातवावर भारीच जीव होता. ती नातवाची जास्त काळजी घेत होती. नियतीला हे सुख फार काळ पाहवले नाही. पांडुरंग अवघा २ वर्षाचा असताना आईचा (सुभद्रा) प्लेगच्या साथीने मुत्यू झाला. घरात दुःखाचे वातावरण निर्माण झाले. आईशिवाय पोरके झालेले पोर म्हणून

त्याच्यावर जगण्याची वेळ आली. पांडुरंगला सख्खा मामा नसल्याने त्याची आबाळ झाली. अन्यथा सुभद्राच्या माहेरच्या लोकांनी त्यास निश्चितपणे आश्रय दिला असता. गावातील जाणकारांनी दुसरा विवाह करण्याचा सल्ला बप्पासाहेबास दिला. घरातील कामे करण्यासाठी व मुलाची काळजी घेण्यासाठी त्यांनी दुसरा विवाह केला, तथापि ती मुलगी फार काळ राहिली नाही, अत्यंत अल्पायुष्य तिला लाभले. अवघ्या १५ दिवसातच तिचा मृत्यू झाला. त्यानंतर पुन्हा तिसरा विवाह करण्यात आला. त्या मुलीने घरातील सर्व लोकांवर विषप्रयोग केला. घरातील सर्व लोक वेड्यासारखी फिरू लागली. त्यांचा आपल्या मनावर ताबा राहिला नाही. त्यांच्यावर उपचार करण्यात आले आणि ह्या मुलीला सोडून देण्यात आले. त्यानंतर बप्पासाहेबांचा चौथा विवाह करण्यात आला, त्या मुलीचा बाळांतपणात मृत्यू झाला. काही केल्या बप्पासाहेबास विवाहसुख मिळत नव्हते. या काळात पांडुरंगची रवानगी पिंपळगांव (कमळेश्वरी) येथे आत्याकडे (सरुबाई जोगदंड) करण्यात आली. सरूबाई पांडूरंगला चांगली माया लावत होती. बिनआईचा मुलगा म्हणून त्याची विशेष काळजी घेत होती. बप्पासाहेबाच्या नशिबी विवाहसुख नव्हते.

तथापि गावातील तारामती कुदळे हिच्याशी विवाह झाल्यानंतर यथावकाश संसाराचा गाडा सुरळीतपणे मार्गी लागला. तारामतीही गावातलीच होती. तिला सिताराम, दत्तू व सायबा असे तीन भाऊ होते. आपली बहिण गावातच आपल्या डोळ्यासमोर राहिल, तसेच बप्पासाहेबाकडे चांगली जमीन आहे. त्यामुळे आपल्या बहिणीचा विवाह त्यांनी बप्पासाहेबासोबत लावून दिला, अशा विवाहास मराठवाड्यात दुसवट्यावर देणे असे म्हणतात. आपल्यापेक्षा मुलाचे वय अधिक आहे ही खंत तारामतीस होती. पुढे बप्पासाहेबास व तारामतीस चित्रा व तुळजीराम अशी दोन अपत्ये झाली. दरम्यानच्या काळात पांडुरंगाचे शिक्षण सुरूझाले. चौथी नंतर त्यांची रवानगी शिक्षणमहर्षी मामासाहेब जगदाळे, यांच्या शिवाजी विद्यालयात करण्यात आली. शिक्षणमहर्षी मामासाहेब जगदाळे यांचे शिक्षणक्षेत्रातील कार्य

खरोखरच वाखाणण्याजोगे आहे. त्यांना शिक्षणाची महती खऱ्या अर्थाने समजली होती. या भागाचा सर्वांगीण विकास करावयाचा असल्यास केवळ दर्जेदार शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. मानवाच्या उन्नतीचा मार्ग केवळ शिक्षणाद्वारे संपादन करता येतो ही बाब मामासाहेब जगदाळेंना पूर्णपणे उमगली होती. त्यामुळेच त्यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची मुहूर्तमेढ या भागातील बार्शी सारख्या ठिकाणी रोवली. बप्पासाहेब हे अशिक्षित असले, तरी "आपल्या मुलाने चांगले शिक्षण घेतले पाहिजे" असा त्यांचा अट्टाहास होता. त्यासाठी कितीही पदरमोड करण्याची तयारी त्यांची होती. त्याकरीता त्यांनी पांडुरंगचा २४/०८/१९६४ रोजी बार्शी मधील नामांकित शिक्षण संस्थेतील वसतिगृहात प्रवेश घेतला. बार्शी हे मोठे गांव होते. रेल्वेमार्गाने ते मोठ्या शहरांशी जोडले गेले होते. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यास जोडण्याचे एकमेव काम रेल्वे करीत होती. जगदाळे मामांनी ही बाब ध्यानात घेऊनच शिक्षण संस्था येथे सुरू केली असावी.

गावातील सुभाष उंदरे, वसंत पाटील यांनी देखील वसतिगृहात मागेपुढे प्रवेश घेतला. दोघेही अतिशय हरहुन्नरी व्यक्ती होते. या त्रिकूटाची चांगली मैत्री जमली. बहुजन समाजातील ही मुले शिक्षणासाठी प्रथमतः दाखल झाली होती. समान ध्येयाने प्रेरित होऊन शिक्षणासाठी दाखल झाले. आपली योजना चांगली असली तरी त्याची अंमलबजावणी करणाऱ्यांनी ती व्यवस्थितपणे पार न पाडल्यास त्याची निष्पती चांगली होईल याची ग्वाही देता येत नाही. शहरी भागात राहण्यास मिळणार ही बाब सुरूवातीला चांगली वाटत होती. वसतिगृहातील जीवन त्यास आकर्षित करीत होते. हळूहळू वसतिगृहात दैनंदिन पांडुरंग रमू लागला. एका इयत्ता मागून दुसरी इयत्ता असा प्रवास सुरू झाला. शाळेत नियमितपणे वृत्तपत्र वाचनाची सवय त्यांना जडली, ही सवय त्यांनी आयुष्यभर सोडली नाही. पांडुरंग व बप्पासाहेबाचा आत्मविश्वास वाढत होता. मुलगा चांगले शिक्षण घेत आहे. त्याला कोणत्याही बाबीची कमतरता पडू नये याची दक्षता बप्पासाहेब घेत असत. वस्तीगृहात आजूबाजूच्या भागातील मुले शिक्षणासाठी दाखल झालेली

होती. त्यांचा एक गट तयार झाला. या गटाचा हेतू अभ्यासापेक्षा मौजमजा करणारा होता. या गटातील मुलांची संगत लागल्याने त्याची परिणीती जुनी इंटरची म्हणजेच १० वीला नापास होण्यात झाली. वसतिगृहात मुलांना चांगली संगत न लाभल्यास व आपल्या मनावरील नियंत्रण सुटल्यास त्याची परिणीती विद्यार्थ्याची अधोगती होताना दिसते. क्षणिक मोहास बळी पडल्याने, त्याची मोठी किंमत व्यक्तीला चुकवावी लागते, परंतु त्याची जाणीव त्यावेळी होत नाही. १० वी अनुत्तीर्ण झाल्याने त्यांचे शिक्षणात मन लागेना. मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे अशी पालकांची कितीही इच्छा असली तरी ती पाल्यांनी मनावर घेतल्याशिवाय फलद्रूप होत नाही. त्यामुळे त्यांनी वडिलांसोबत शेती करण्याचा निर्णय घेतला. शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असल्याने केवळ मेहनतीच्या जीवावर शेती करणे अत्यंत जिकरीचे होते. तथापि दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर करणे, मराठवाड्यासारख्या पर्जन्यछायेच्या प्रदेशात आण्णांनी (पांडुरंग) शेती नफ्यात करण्यास सुरूवात केली. तलावातून इंजिनाच्याद्वारे सिंचनाची सोय करून, भाजीपाला घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नात भरघोस वाढ झाली. आधुनिकतेची कास लावून धरून शेती केल्याने कोरडवाहू भागात देखील चांगली शेती करता येते हे आण्णांनी दाखवून दिले. त्याची परिणीती अशी झाली की, आण्णांच्या (पांडुरंग) लग्नाचा विषय घरात, आप्तस्वकीयांत रंगू लागला. मुली पाहण्याची लगबग सुरू झाली.

गावातील नारायण उंदरे यांनी पांडुरंग यांच्या करिता त्यांच्याच चुलत मेहुणीचे स्थळ सुचविले. मुलगा चांगला, होतकरू व शिक्षित आहे, पोटापाण्याची सोय म्हणून १० एकर शेती आहे असे स्थळ हातचे जाऊ नये. म्हणून हे स्थळ त्यांनी ताराबाई बाळासाहेब देशमुख यांना दाखविले. ताराबाई ही सावळी असली तरी चाफेकळी नाक, देखणी, हजरजबाबी, सुशील व खानदानी असल्याने लगेच सर्वांच्या पसंतीस उतरली.

ताराबाईस चार बहिणी व एक भाऊ. थोरली मौजाबाई, दुसरी छाया, तिसरा व्यंकटराव त्यानंतर तारा तर शेंडेफळ हिरा, असा बाळासाहेब व

गजराबाई या दाम्पत्याचा परिवार. हे कुटुंब अतिशय कष्टाळू व सुखवस्तु कुटुंब. त्याकाळात बाळासाहेबास बसण्यास घोडी होती. यावरून त्यांच्या रूबाबाची आपणांस कल्पना येईल. ते शेती बरोबरच अफूचा व्यापार करीत. अफूच्या व्यापारातून त्यांनी चांगला पैसा मिळविला होता. त्यांचा हा व्यापार खर्ड्यामार्गे अहमदनगर पर्यंत चालत असे. या व्यापारातून भरपूर पैसा मिळविल्यानंतर त्यांनी राहण्यासाठी चांगला मोठा वाडा बांधला होता. ''आडाचा वाडा'' म्हणून तो ओळखला जात असे. हा ईटमधील प्रस्थापितांच्या घरापैकी एक होता. वाड्याला पूर्णपणे बंदिस्त कोट, बुरूज, जुन्या काळातील खणांचे बांधकाम व याशिवाय वाड्यातच पाण्याचा आड (विहीर)महिलांना पाणी भरण्यासाठी वाड्याबाहेर जाण्याची गरज लागू नये याकरीता ही सोय करण्यात आली होती म्हणून या वाड्यास ''आडाचा वाडा'' म्हणून ईट मध्ये ओळखले जात असे,महिलांना सन्मानाने वागविण्याबरोबरच सुरक्षितता तसेच निजामाच्या राज्यात या परिसरात वावरण्यात असलेल्या मर्यादांचे प्रतिक असल्याचा दिसतो. तथापि, घरातील कर्त्या पुरूषाचा मृत्यू झाल्यामुळे गजराबाई देशमुख आपल्या मुलाला हाताशी धरून संसाराचा गाडा ओढण्याचा प्रयत्न करीत होती. लोकांकडे मोलमजुरी करण्याची सोय नव्हती, कारण गावातील प्रतिष्ठेस ते न शोभणारे होते. परंतु उपाशीपोटी व लेकराबाळाच्या मायेकरीता माणूस आपल्या प्रतिष्ठेस फार काळ कवटाळून धरून ठेऊ शकत नाही. नवऱ्याच्या अकाली निधनाने विस्कटलेली संसाराची घडी सावरण्याचा प्रयत्न मुलगा व्यंकट देशमुखला हाताशी घेऊन गजराबाई करीत होती. त्यातच मुलीचे लग्न म्हणजे मोठा खर्च? हा कसा करावयाचा हा यक्ष प्रश्न तिच्या समोर होता. शेतीवर थोडेसे कर्ज घेऊन मुलीचे लग्न करण्याचे तिने ठरविले. साधारणतः सन १९७४ च्या सुमारास ठरलेल्या दिवशी सर्व वऱ्हाडी मंडळी बैलगाडीने लग्नासाठी रूईला एकत्रित आली. पंडितदेवाच्या (ब्राह्मण) साक्षीने लग्न लागले. लग्नासाठी निळा शालु ताराबाईला घेतला होता, ती अतिशय सुंदर दिसत होती. लग्न थाटामाटात पार पडले. वऱ्हाडी मंडळीसाठी लापशीचा

बेत आखण्यात आला होता. नवीन नवरी घरात आल्याने आनंदाचे वातावरण होते. नववधू ताराबाईला मात्र नवीन घरात समायोजन करताना होणारा त्रास सहन करावा लागत होता. त्यात तिला साथ लाभली ती बप्पासाहेबांची. आपल्या मुलांबरोबर संसार करणे किती आवघड आहे याची पुरेपूर जाणीव त्यांना होती. त्याच्यात बंडखोरी वृत्ती, हेकेखोरपणा, हट्टी हे गुण आलेले आहेत याची जाणीव त्यांना झालेली होती, परंतु पुत्र प्रेमापोटी या सर्व बाबींकडे त्यांनी वेळोवेळी दुर्लक्ष केलेले होते.

सन १९७२ च्या सुमारास महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेची कामे सुरू झाली होती. दुष्काळात लोकांना उपजिवेकेसाठी काम उपलब्ध व्हावे या करीता शासनाने ही योजना सुरू केली होती. या योजनेतंर्गत रस्त्याची काम चालत असत. या कामावर देखरेखीचे काम पांडुरंगकडे (मुकादमाचे) आले होते. त्यामुळे त्याची उठबस गावातील पुढाऱ्यात सुरू झाली होती, ही बाब बप्पासाहेबांना अजिबात आवडत नव्हती. त्यांचे म्हणणे असे होते की, तु आपले काम करावे गावातील भानगडीत लक्ष घालू नये. तथापि, वडिलांचा हा सल्ला पांडुरंगला अमान्य होता. तो भावकीतील लोकांत सहभागी होत असे. त्यांचे सवंगडी देखील सर्व थरातील असत. जातिभेद त्यास मान्य नव्हते. वसतिगृहात राहिल्याने सर्व जातिधर्मातील मुलांसोबत राहणे गरजेचे आहे ही त्याची धारणा झाली होती. सर्वांना एकत्रित घेऊन पुढे जायचे त्यासाठी वेळप्रसंगी पदरमोड करण्याची त्याची तयारी होती. त्यामुळेच त्याला गावातील समाजकारणात व राजकारणात आकर्षण निर्माण झाले. पंचायतराज संस्थेतील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे ग्रामपंचायत. या ग्रामपंचायतीच्या एका गटातून निवडणूक लढण्याची तयारी त्याची होती. लोकांनी आणाभाका घेऊन त्यास उमेदवारी देऊ असे निश्चित केले तथापि, मोक्याच्या वेळी राजकारण शिजले व त्याला निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. ही गोष्ट त्याच्या फार जिव्हारी लागली. निवडणूक ही बाब अशी आहे की, व्यक्तीस त्याची धुंदी चढल्यानंतर ती उतरेपर्यंत व्यक्तीस वस्तुस्थिती लक्षात येत नाही, तो पर्यंत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेलेले असते.

राजकारणात आपला कटकारस्थानी गावकाऱ्यांसमोर निभाव लागू शकत नाही ही बाब लवकरच त्याच्या लक्षात आली. मुंबईनगरी ही जादुई नगरी असून आपल्या स्वप्नास आकार देण्याची ताकद मुंबई नगरीमध्ये आहे तेव्हा आपले नशिब आजमाविण्यास काय हरकत आहे ? या विचाराने आकर्षित होऊन अंदाजे सन १९७७ च्या सुमारास पांडुरंग पोटापाण्यासाठी शोधार्थ मुंबई येथे आला.

पांडुरंग मुंबईला कामानिमित्त गेल्याने ताराबाईची रवानगी ईटला करण्यात आली. त्यावेळी ताराबाईला सोडण्याचे कारण बप्पासाहेबांनी दिले की, हुंड्यातील रू.२०० बाकी राहिले म्हणून सुनेला माहेरी सोडण्यात आलेले आहे. गजराबाईला ही बाब फार लागली. जावई कोठे आहे? याची माहिती नव्हती. अशा परिस्थितीत महिलांसमोर दुसरा पर्याय तरी काय असू शकतो? निमूटपणे आलेल्या परीस्थितीस सामोरे जाणे भाग होते. दिवसामागून दिवस जात होते? पांडुरंगाच्या पोटी पुत्र प्राप्ती झाली. सर्वांना आनंद झाला. ताराबाई व पांडुरंग यांच्या पोटी मुलगा झाला. त्याचा आनंद साजरा करण्यासाठी मुलाचे वडील जवळ नाहीत ही बाब ताराबाईस वेदना देणारी होती. देशमुख कुटुंबियाच्या शेतात ''सात आसरा'' देवीचे जागृत स्थान होते. ह्या नदीच्या काठी वसतात त्यांची कृपा सर्व कुटुंबावर असते. त्याची या देवीवर पूर्ण श्रद्धा होती. तिच्या कृपाप्रसादामुळेच आपणांस पुत्रप्राप्ती झाली आहे ही तिची धारणा होती. त्यामुळे त्याचे नाव आसरूबा किंवा अशोक ठेवावे असे पर्याय पुढे आले. मुलाचे नामकरण ''अशोक'' म्हणून करण्यात आले. गजराबाईच्या समस्यात वाढ झाली होती. मुलीबरोबरच नातवाची जबाबदारी वाढली होती. त्याचबरोबरच धाकट्या मुलीचे म्हणजेच हिराचे लग्न करावयाचे होते. त्यात तारा नांदत नसून तिला टाकून दिले आहे ही बाब अडचणीची होती. त्यामुळे तिला हिराबाईचे लग्न जमविण्यात अडचण येत होती. ही बाब ती मुलीला सांगू शकत नव्हती.

दिवसामागून दिवस जात होते. मुलगा लहानाचा मोठा होत होता. मुलास दुधाची आवश्यकता होती तेव्हा ताराबाई मुलास सांगत असे की,

तुला दुध पुरत नाही तर अधिकच्या दुधाची मागणी मामाकडे कर. त्यास मामी चांगले उत्तर देई, काय करणार हो अशोक गाय इतकेच दुध देते? सदर बाब व्यंकटमामाच्या लक्षात आल्यानंतर त्याने शेजारच्या घरात दूध काढून ठेवण्यास सुरूवात केली. मुलांना दूध पाजण्यापेक्षा ते डेरीवर घातल्यास चार पैसे हाताशी येतील हा व्यवहारी दृष्टीकोन त्या मागे होता. त्यात वावगे असे काही नव्हते. मात्र आईच्या मनास ती बाब चटका लावणार होती.

गजराबाईने मुलगा झाल्याची माहिती बप्पासाहेबांना कळविली परंतु हुंड्यातील रू.२०० बाकी असल्याने ते मुलास पाहण्यास आले नाहीत. गजराबाईच्या धाकट्या मुलीने हिराबाईने मोलमजुरीतून रू.२०० (बचतीतून) जमा केले व बप्पासाहेबांना निरोप पाठविला की आपले रु.२०० व सुनबाई यांना घेऊन जावे. बप्पासाहेब आले ते केवळ रु.२०० घेऊन गेले कारण पांडुरंग कोठे आहे याची माहिती त्यांना सुद्धा नव्हती. हिराबाईनी पांडुरंगची माहिती काढली तेव्हा तीस समजले की, आपला मेहुणा कामानिमत्त चेंबूर, मुंबई येथे आहे. त्यास तिने पोस्टकार्ड (त्या काळात संदेशवहनाचे प्रभावी माध्यम) पाठवून माहिती दिली की, तुम्हास मुलगा झालेला आहे आपण आपल्या मुलास पाहण्यास यावे. पांडुरंग ही माहिती समजताच ईट येथे आला.

पांडुरंगने आपल्या मुलास पाहिल्यानंतर फार आनंद झाला. आपल्या बायकोचा आपल्या घरच्या लोकांनी केलेला सासूरवास त्यास सहन झाला नाही. त्याने आपल्या पित्याची अवाज्ञा करून आपल्या मुलास व पत्नीस मुंबईला घेऊन आला. तत्कालीन परीस्थितीत वडिलांची अवज्ञा करणे मुलास कठीण होते. त्या पेक्षा बायकोस झालेला त्रास अधिक क्लेशदायक होता, केवळ मुलाच्या प्रेमापोटी त्याने हे कृत्य केले. आपली पत्नी आणि मुलास घेऊन पांडुरंग मुंबईस आला. आपल्या कुटुंबियासहीत तो ''सम्राट अशोकनगर'', नवजीवन सोसायटी समोर, चेंबूर, मुंबई येथे राहण्यासाठी आला. तेथे राहण्यासाठी एक खोली पुरत्या जागेची सोय स्थानिक लोकांच्या मदतीने केली. गावातील सुताराची काही मुले येथे राहत होती. तसेच लाल

डोंगर या भागात देखील पिंपळगाव, रूई, पारगाव इ या भागातील काही लोक राहात होते. आपल्या भागातील लोक येथे आपल्या सहवासात आहेत ही बाब परमुलखात राहण्यास बळ देणारी होती. या सर्व लोकांची भावनिक जवळीक निर्माण करणारी होती. त्यांची मदत त्यांना येथे स्थिरस्थावर होण्यासाठी झाली याबाबत दुमत नाही.

या काळात तो ''युनियन कार्बाईड'' या कंपनीत काम करीत होता. कंपनीत अतिशय प्रामाणिकपणे काम करीत असल्याने कंपनीने पगारात भरघोस वाढ केली. पांडुरंगची प्रवृत्ती फार काळ कामात रुळणारी नव्हती. स्वतः व्यवसाय सुरू करण्याची त्याची धडपड सुरू होती. दिवसामागून दिवस जात होते. सन १९७९ च्या एप्रिल महिन्यात घुले कुटुंबियांच्या परिवारात नविन सदस्य दाखल झाला. पांडुरंगला कन्यारत्नाचा लाभ झाला. आधी मुलगा नंतर मुलगी चौकोनी कुटुंब तयार झाले. विशेष बाब म्हणजे पांडुरंगची नोकरी सुटून त्याने व्यावसायाची सुरूवात करण्याची चिन्ह दिसू लागली. त्यामुळे ''मुलीस'' पांडुरंग भाग्यरत्न मानू लागला. तिचे नाव त्याने मिरा असे ठेवले. याच मुलीच्या नावाने ''मिरा प्लास्टिक प्रोसेस'' त्याने सुरू केला. मुलीवर त्याचा विशेष जीव होता.

स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा प्रयोग त्यांनी श्री. विठ्ठल लिमसे यांच्या सोबत केला. त्यांनी प्लास्टिक मटेरीयल (भंगार) टाकाऊ वस्तू संकलित करण्याचे दुकान १९७९-८० च्या सुमारास सुरू केले. विशेषतः दुधाच्या वापरलेल्या थैल्या यांचा समावेश यात होता. यात दुकानावर बसण्याची जबाबादारी लिमसे यांच्या कडे तर दुकानात दिवसभर संकलित झालेला माल, संध्याकाळी व्यापाऱ्यांना विकण्याची जबाबदारी पांडुरंग यांच्याकडे होती. घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत हा व्यवसाय होता. काळाची पाऊले ओळखून त्याने व्यावसायाची निवड केली होती. हा व्यापार करीत असताना त्याचे संबंध एका मद्रासी व्यापाऱ्याशी आले. त्याने संकलित केलेल्या प्लास्टिकवर प्रक्रिया करून विक्री केल्यास नफा अधिक होतो ही बाब निदर्शनास आणून दिली. या व्यापाऱ्यांने त्याच्या

जीवनास कलाटणी दिली. दोघांनी एकत्रित येऊन व्यावसाय करण्याचे ठरले. मुंबईत जागा घेणे अवघड होते, म्हणून मुंबईपासून लांब जागा घेण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळे करावी लागणारी गुंतवणूक कमी लागेल. स्वभावानुसार लगेच जागा शोधण्यास सुरूवात झाली.

मुंबईच्या आसपासचा परिसर पिंजून काढण्यात आला. कल्याण, ठाणे, भिवंडी येथील काही जागा पाहिल्या. आपल्या आर्थिक आवाक्यातील कामतघर येथील जागा निश्चित करण्यात आली. सदर जागा घेण्यासाठी श्रीयुत. दतात्रेय काळे यांनी त्यास मदत केली. श्री. रामनरेश पांडे यांच्याकडून त्यांनी व्यवसायासाठी जागा सन १९८१ च्या जानेवारी महिन्यात खरेदी केली. सदर जागे संबंधी मालकी हक्का संदर्भात दिवाणी दावा मूळ मालकांनी दाखल केला. त्यावर न्यायालयातून स्थगिती (स्टे) मिळवून त्यांनी बांधकामास सुरूवात केली. हा दावा त्यांना आयुष्यभर पुरला त्याला कधीही मनशांती लाभली नाही. व्यवसाय भागीदारास व्यवसाय सुरू करण्यापूर्वीच अडचणींना सामना करावा लागत असल्याने व्यवसाय (काम) सुरू करण्याची इच्छा नसल्याचे सांगून त्यांनी आपली भागीदारी व्यवसायातून काढून घेण्याचे ठरविले. एकदा टाकलेले पाऊल मागे न घेता पांडुरंगने व्यवसाय करण्याचा धाडसी निर्णय घेतला. त्याने नाउमेद न होता येथे त्यांनी प्लास्टिकच्या टाकाऊ पिशव्यापासून पीव्हीसी पाईप बनविण्यासाठी कच्चा माल तयार करण्याचा उद्योगधंदा, या पंचक्रोशीतल नामांकित महसूल आधिकारी ए.आर. पाटील नायब तहसिलदार यांच्या शुभहस्ते सुरू केला. मिरा या मुलीच्या नावाने ''मिरा प्लास्टिक प्रोसेस'' ही कंपनी त्याने सुरू केली. या भागातील हा पहिला व्यवसाय त्यामुळे अनेक समस्यांना त्यास सामोरे जावे लागले. जागेवर जाण्यासाठी रस्त्याचा प्रश्न हा ज्वलंत प्रश्न होता. तो त्यास निर्णायकपणे सोडविता आला नाही. येथे त्याचा अनुभव कमी पडला. त्याचे दुरगामी परिणाम त्याच्या व्यक्तीगत जीवनावर व व्यवसायावरही झाले. येथे अनुभव कमी पडल्याचे दिसते. माणूस अनुभवातून अनेक बाबी शिकत असता, परंतु हा अनुभव घेण्याची फार मोठी किंमत त्याला चुकवावी

लागते अगदी काहीसे तसेच त्याचे झाले. व्यवसाय व्यवस्थापनात जागेचे ठिकाण हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. क्लिअर टायटल जागा असल्यास कोर्टकचेरीच्या भानगडी मागे लागत नाहीत त्यामुळे आपल्या व्यावसायिक प्रगतीवर लक्ष देता येते.

प्रथमतः विजेची अडचण आली. वीज जोडणी मिळण्यात अडचणी होत्या. पोलवरून लाईन आलेली नव्हती. एम.एस.ई.बी. च्या माध्यमातून ही सोय करून घेण्यासाठी त्यांने पाठपुरावा केला. सन १९८० च्या दशकात ''थ्री फेज'' वीज जोडणी घेणाऱ्यांची संख्या कामतघर गावात कमी असल्याने ही जोडणी लगेच मिळत नव्हती. यासाठी त्यास मा. पद्मसिंह पाटील, तत्कालीन उर्जा मंत्री यांची चांगली मदत झाली. वीज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घातले. परिणामी वीज जोडणी तत्काळ मिळाली. वीज मिळाली तरी व्यवसायातील अडचणी संपण्याचे नाव घेत नव्हत्या. स्थानिक दूध व्यवसायिकांची म्हैस गवत चरत असताना विजेच्या खांबास जाऊन चिटकली, त्यात तिचा मृत्यू झाला. त्याची भरपाई पांडुरंग यांच्या कडून वसूल करण्यात आली. संकटाची मालिका काही केल्या संपत नव्हती. एकामागून एक संकट येत होती. चिवटपणे आपले काम करण्याची प्रामाणिक इच्छा पांडुरंगची होती. त्यास त्याला साथ लाभली ती स्थानिक श्री. बारकू काशिनाथ पाटिल यांची त्याची चांगली मैत्री झाली. शेवटी उद्योग सुरू झाला. त्यांने चांगले लक्ष घातले त्यामुळे या उद्योगात त्यांची चांगली भरभराट झाली तथापि, मद्यपानाची वाईट सवय येथेच अधिक बळावली. स्वतःवर त्याचे नियंत्रण राहिले नाही. व्यक्तीचा विकास अधिक जोमाने होताना अडचणी येतात परंतु व्यसनाची वाढ मात्र वाईट संगतीत अधिक गतीने होताना दिसते याचा प्रत्यय त्यास येथे आला. त्यासाठी व्यक्तीवर घरातील वडीलधाऱ्या माणसाचा धाक नसल्याने त्यात भर पडली नाही तर नवलच झाले असते.

एखादे काम झपाटल्याने करणे, ते काम गोपनिय ठेवणे ही पांडुरंगची खासीयत होती. नवीन उद्योग सुरूकरण्याची कल्पना त्यांने आपल्या पत्नीसही

दिली नाही. कामतघर, भिवंडी येथे कारखाना सुरू करण्यासाठी जात आहोत हे न सांगता तो पंधरा दिवस न सांगता घरी आला नाही. पती शिवाय चेंबूर येथे राहणे जिकरीचे होते. आर्थिक बाबीची अडचण नव्हती. त्यासाठी नियमितपणे पैसे मिळतील याची सोय लावून देण्यात आली होती. पण आपला नवरा कोठे आहे ? तो कुठल्या अडचणीत तर नसेल ना? अशा अनेक बाबी तिला स्वस्थ बसू देत नव्हत्या. ही चिंता तिला सतावत होती. पती घरी येत नाही तेव्हा तिने त्याचा शोध घेण्यासाठी श्री. लिमसे यांना विनंती केली. तेव्हा त्यांना माहिती मिळाली की, भिवंडी येथील कामतघर गावी पांडुरंग प्लास्टिक पिशव्यावर प्रक्रिया करण्याचा व्यवसाय सुरू करीत आहे. आपल्या भागिदाराने आपणांस न सांगता नवीन व्यवसाय सुरू करत आहे, ही बाब दोघात मनभेद निर्माण करण्यास पुरेशी झाली. कोणत्याही व्यवसायाचा मुख्य आधार हा विश्वास असतो. तो एकमेकांवर न राहिल्यास असा व्यवसायाचे चालणे अवघड असते. वस्तूस्थिती अशी होती की, लिमसे यांचे बंधू कामात त्यांच्या मदतीस होते. व्यवसायात जमा होणाऱ्या पैशातून पांडुरंगला न सांगता त्यांनी भिशी सुरू केली. ही बाब गोपनीय ठेवल्याने, एकत्रित उद्योग करण्याच्या मूळ तत्वास बाधा आणणारी होती. त्यामुळे चेंबूर येथील व्यवसायात स्वारस्य कमी होण्यास सुरूवात झाली होती.

लिमसे यांना मिळालेल्या माहितीच्या आधारावर, ताराबाई व राजेंद्र सुतार भिवंडी येथील गावात १९८० मार्च मध्ये पांडुरंगच्या शोध कार्यासाठी आले. तेव्हा त्याना दिसले की, नविन व्यवसायाच्या सुरूवातीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. ताराबाईस आपला नवरा सुखरूप असल्याचा आनंद झाला. पुढे कामतघर ही त्याची कर्मभूमी झाली होती. त्याने आपले कुटुंब १९८० च्या एप्रिल महिन्यात कामतघर येथे स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेतला. राहण्यासाठी श्री. रामू चौधरी (रामू शेठ) यांच्या घरातील एक खोली तात्पुरत्या स्वरूपात निश्चित करण्यात आली. चेंबूर येथील आपले सामान सुमान जमा करून तो भिवंडीत कुटुंबियांसहीत आला. पुन्हा नविन

परिसर, ओळखीचे लोक नाहीत. लोकांची भाषा, राहणीमान, चालीरिती वेगळ्या होत्या. रामू शेठ व त्यांची पत्नी शेवंताबाई लाघवी व मनमिळाऊ होते. अत्यंत अपुरी जागा, कोंदूट वातावरण. तिने कोणतीही तक्रार न करता नव्याने आपल्या संसारास सुरूवात केली. वास्तविक रामू शेठ यांना दारू पिण्याचे प्रचंड व्यसन होते. त्यांच्या दिनचर्येची सुरूवात पिण्याने होत असे तर दिवसाची अखेरही पिण्यानेच होत असे. त्या काळात त्याच्याकडे ट्रक (लॉरी) होता. त्यांचा माती, दगड, बांधकाम साहित्य पुरविण्याचा व्यवसाय होता. पिण्याच्या व्यसनाने त्यांचा अकाली मृत्यू झाला. शेवंताबाईच्या नशिबी दुःख आले. आपला पुढील काळ नवऱ्याशिवाय काढण्याचे दुःख त्यांच्या नशिबी नवऱ्याच्या ''दारू प्रेमामुळे'' आले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारतातील अनेक महिलांच्या नशिबी असे दुःख येते. त्या कोणतीही तक्रार न करता आपले जीवन घालवित असतात.

मुलांच्या शिक्षणाची सोय ''जिल्हा परिषदेच्या १९ नं शाळेत'' (पुढे हिच शाळा भि.नि.न.पा. शाळा क्र.४२ म्हणून ओळखण्यात येऊ लागली) करण्यात आली. ही शाळा घरापासून अगदी जवळ होती त्यामुळे नेण्याआणण्याची समस्या नव्हती. मुलाच्या शिक्षणाबाबत अण्णा बप्पासाहेबाप्रमाणे संवेदनशील होते. त्याने मुलास शाळेत पाठविले तसेच त्याला सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याकडे त्यांचा अधिक कल राहिला. मुलासाठी नविन कपडे आणले, नविन पुस्तके आणली, रेनकोट आणला, मुलास शाळेत नेऊन सोडले. परंतु मुलगा मात्र शाळा जवळ असल्याने तो घरी काही तरी कारण काढून येत होता. तेव्हा ही बाब लक्षात आल्यावर त्याने त्याच्या एक कानाखाली ओढलेली मी आजपर्यंत स्मरणात शिदोरीप्रमाणे ठेवलेले आहे. तेव्हा पासून मुलाने कधीच शाळा बुडविली नाही. त्याने शाळेत नियमितपणे जाण्यास सुरूवात केली. ती त्याने आयुष्यभर सोडली नाही. योग्यवेळी केलेली शिक्षा उपयोगी आली. त्यासाठी शिक्षणांसाठी मुलगा आपल्या समोर राहिल्यास पालकास योग्य वेळी त्याची चूक दाखविण्याची संधी मिळते.

पांडुरंगच्या गृहस्थाश्रमात ताराबाईची उणेपुरे ४४ वर्षाची साथ लाभली. चांगल्या – वाईट प्रसंगात तिने पूर्ण साथ दिली. आईशिवाय वाढलेल्या मुलात जे अवगुण सहजपणे मुलात येतात त्या अवगुणाची लागण पांडुरंगला देखील झालेली होती. वस्तिगृहात राहिल्याने अनेक वाईट सवयी लागल्या. त्या आयुष्यभर त्यांनी सोडल्या नाहीत. सिगारेट ओढणे, मद्यपान करणे या सवयीने त्याला लागल्या त्या सोडता आल्या नाहीत. ताराबाईची येथे फार तारांबळ उडत होती. तिला मुलांचे संगोपन व नवऱ्याकडे जातीने लक्ष घालावे लागत होते. आपल्या व्यथा सांगण्यासाठी जवळचे कोणी नव्हते. परका मुलुख लोकांवर विश्वास ठेवता येत नव्हता. मनातील दुःख कोणास सांगता येत नव्हते, नवरा व्यवसायानिमित्ताने हा पायाला भिंगरी लावल्याप्रमाने फिरणारा. तिची कुचंबणा होत होती. अक्षर ओळख नसल्याने पत्राद्वारे माहेरी किंवा सासरी आपली दुःख कळविता येत नव्हती. अशा काळात शेजारी पाजारी लोकांनी तिला मदत केली. व्यक्तीच्या अंगी चांगुलपणा, प्रामाणिकपणा असला की, देव त्याला हजार हातानी मदत करतो. तिच्या चांगल्या बोलण्याचा परिणाम म्हणून तिला मदत करण्यासाठी लोक तयार होत. त्यातील काही नाती आयुष्यभर पुरणारी ठरली. तिने देखील ती व्यवस्थितपणे निभावली. यातील हांडीबाग कुटुंबियाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. अगदी कठीण प्रसंगी देखील ही मंडळी तिच्या कामी येत. ती देखील त्यांच्या कामासाठी धाऊन जात असे.

हांडीबाग कुटुंबियांचा इतिहास पाहता ही मंडळी मुळची बीड मधील केज तालुक्यातील चिंचपूर गावची. ज्यावेळी रक्ताची नाती जवळ नसतात तेव्हा माणूस मानलेली नाती मनापासून जपण्याचा प्रयत्न करतो. शेवटी माणूस हा समाजशील प्राणी आहे. समाजात वावरताना त्याला अशी नाती निर्माण करावी लागतात. त्या नात्यानी मैत्रीसंबंधांनी जगणे सुखकारक होत असते. त्यात स्वार्थ दडलेला नसतो तेथे केवळ देण्याची भावना असते. त्यातून ही नाती चिरकाळ टिकतात. हांडीबाग कुटुंबियात तीन भाऊ एकत्रित राहत होते. अनूरथ १२ वी झालेला कुटुंबाच्या उन्नतीसाठी भिवंडीत आलेला,



आण्णा आणि बा नातवाशी खेळताना



मुलीच्या लग्नाचा आनंद



भाच्याच्या लग्नातील उपस्थिती



भाच्याच्या लग्नातील उपस्थिती



दत्ता मोरे (नातू) याच्या लग्नातील प्रसंग



सोनालीच्या लग्नप्रसंगी



'मुंबई दर्शनात' मग्न आणणा



पंढरीच्या वारीतील वारकरी आणणा



‘रुई’ गावातील मंदिर




‘रुई’ गावातील मंदिर



मन्मत स्वामी (गोसाव्याचा) मठ



'रुई' गावातील पिर




नातू सुमेधचा पहिला वाढदिवस - सोबत दिव्या (नात)



नातू सुमेधचा पहिला वाढदिवस



भाचीच्या लग्नातील कन्यादान प्रसंगी आण्णा



भाचीच्या लग्नातील प्रसंग




मुलगा अशोकच्या लग्नातील आनंददायी क्षण



कै. बारकु काशिनाथ पाटील (आण्णांचे मित्र)



विवाह नोंदणी कार्यालयात



नातवासोबत




आण्णांची शाळा

सतत पाय जमीनीवर ठेऊन चालणारा. त्याची आई ही त्यांच्या सोबत राहत होती. मुल कामावर गेल्यानंतर एक बुजूर्ग व्यक्ती म्हणून ती ताराबाई जवळ येऊन बसत असे. त्यांना ताराबाई ''मावशी'' म्हणत असे. दोघींमध्ये चांगले मेतकूट जमले होते. पर्यायाने तिची मुले तिचे भाऊ झाले होते. त्यांना देखील बहीण नव्हती, ती ताराच्या रुपाने त्यांना मिळाली. ते सतत तिला मदत करीत असत तसेच तिच्या पाठीशी उभे राहत. गणपती, दहीहंडी उत्सव पाहण्यासाठी दोघी एकत्रित जात. दोघींचे माईलेकीचे नाते निर्माण झाले होते.

दारू पिणाऱ्या नवऱ्याचा सर्वात वाईट गुण म्हणजे बायकोवर संशय घेणे हा असतो. नवऱ्याने तो घेतल्यावर बायकोला तिचे जगण्यातील व संसारातील स्वारस्य कमी होण्यास वेळ लागत नाही. व्यक्ती वैफल्यग्रस्त होण्यास वेळ लागत नाही. त्यातच रक्ताच्या नात्यातील लोक जवळ नसल्याने आपली अगतिकता कोणाला सांगणार? यात शेजाऱ्याची व जोडलेली नाती फार महत्वाची भूमिका पार पाडतात. रक्ताच्या नात्यापेक्षा ती अधिक उपयुक्त व विश्वसनीय वाटतात. अशा काळात अन्यायाची परिसिमा झाल्यास व्यक्तीचा तोल जातो व ती व्यक्ती आत्महत्येस प्रवृत होताना दिसते. एका रात्री जीवास कंटाळून तिने तलावात उडी टाकून जीवन संपविण्याचा निर्णय घेतला. ती धावत निघाली. आता बस्स झाले सगळे संपवायचे हा त्रास अधिक काळ सहन होत नाही, यातून आज मुक्तता घ्यायची हा विचार तिने पक्का केला होता. पण मुलगा मागे धावत जाऊन त्याने आईच्या कमरेला मिठी घातली. हे प्रसंगावधान योग्य ठरले, तिने आपला निर्णय बदलला. काही झाले तरी जगायचे मुलांना मोठे करायचे तिने ठरविले. घरी आल्यानंतर नवऱ्याने पुन्हा प्रचंड मारझोड केली. तोही हट्टालाच पेटला होता पण तिच्या निर्धारापुढे तो टिकू शकला नाही.

दिवसांमागून दिवस जात होते यातच, व्यसनात आधिकाधिका अडकत चालल्याने व्यवसायाकडील त्याचे लक्ष विचलित होते. कुटुंबाच्या प्रगतीकडे त्याचे दुर्लक्ष होत होते. मुलगा व मुलगी लहानचे मोठे होत होते. १९८४

च्या सुमारास भिवंडीत हिंदू - मुस्लीम जातीय तेढ निर्माण झालेली होती. पूर्णतः भिवंडीत संचारबंदी लावलेली होती. अशा काळात कामानिमित्त सोलापूर येथे गेला होता. तथापि येथील लोकांच्या विश्वासावर त्यांचा भरोसा होता. अशा काळात तो आपल्या कुटुंबियासोबत असला पाहिजे ही भावना त्याला सोलापूर मध्ये स्वस्थ बसू देत नव्हती. तो संचारबंदीत भिवंडीत पोलिसाच्या मदतीने आला. कौटुंबिक ओढ व्यक्तीस आपल्या जवळच्या व्यक्ती अडचणीत आहेत म्हटल्यावर स्वस्थ बसू देत नाही हे नैसर्गिक आहे.

श्री. आण्णासाहेब देशमुख ईट मधील प्रसिद्ध असामी, ईटचे ते नेतृत्व करीत. त्यांचे मुंबईला प्रथमतः कामानिमित्त येणे झाले. त्यावेळी त्यांनी आवर्जून पांडुरंगला बोलवून घेतले की, मंत्रालयात जावयाचे आहे. तेव्हा मुंबईतले आपण जाणकार आहात तेव्हा सोबत मंत्रालयात चला. त्यावेळी पांडुरंग पूर्णवेळ त्यांच्यासोबत होता. पुढे आण्णासाहेब राजकारणात अनेक महत्वपूर्ण पदे भूषविली त्यात उपाध्यक्ष जिल्हा परिषद, उस्मानाबाद याचा उल्लेख करता येईल.

सन १९८६ च्या सुमारास मुलाच्या हातास अपघात झाल्याने त्याने आपल्या कारखान्यातील मशिनरी विकण्याचा निर्णय घेतला. वास्तविकपणे हा व्यवसाय निर्माण करण्यासाठी त्यांने प्रचंड मेहनत घेतली होती पण पुत्र प्रेमाच्यापोटी आपला व्यवसाय त्याने बंद केला. माणसाने व्यवसाय करीत असताना भावनिकपणे निर्णय घेऊन उपयोग नसतो. त्याने बऱ्याच वेळा तोटा होण्याची शक्यता अधिक असते. व्यवसायात सुरक्षिततेस प्राधान्य देणे आवश्यक असते. तो त्यांनी न केल्याने हा अपघात झालेला दिसतो. लहान मुलाना कारखान्यात जोखमीची कामे देऊ नयेत किंवा अशा कामाच्या ठिकाणी त्यांना येऊ देऊ नये हा नियम असताना त्याचे पालन केलेले दिसत नाही. व्यवसाय बंद झाल्याने तसेच मुलाच्या अपघातामुळे पांडुरंगला वैफल्य आले. त्यात व्यसनाधिनता वाढत चालली होती. मुलाने अधिकाधिक शिक्षण घेतले पाहिजे यासाठी त्याला सुविधा देण्याकडे त्यांचा कल अशा

परिस्थितही असे. १९९० मध्ये मुलाची एस.एस.सी ची परीक्षा झाली. परीक्षेनंतर त्यांनी ट्राझींस्टर (रेडीओ) दुरूस्ती करता यावी या करिता मनोहर जोशींच्या ''कोहीनूर टेकनिक्ल इन्स्टीटय़ूट'' मध्ये प्रवेश घेतला. मुलास रेडिओ दुरूस्तीचे कौशल्य मिळविता आले तर त्याचा पुढील पोटापाण्याचा मार्ग सुखकर होईल या भावनेपेक्षा मुलगा वाईट संगतीत लागणार नाही याचीही दक्षता होती. असंगतीमुळे आपले न भरून येणाऱ्या नुकसानाची त्यास कदाचित जाणीव होत असावी. एस.एस.सी निकालाच्या आदल्या दिवशी त्यांनी पेढे आणून आजुबाजूला वाटले. वास्तविकपणे असे वागणे ''थोडे अधिक धाडसाचे'' होते. मुलगा नापास झाल्यास आपल्याला खाली मान घालावी लागेल याच्या भितीपेक्षा आपला मुलगा कोणत्याही परिस्थितीत पास होणार याची त्यांना खात्री होती. आपल्या सारखी नापास होण्याची वेळ मुलावर येऊ नये यासाठी देवाकडे केलेली प्रार्थना होती ही बाब त्यांची त्यांनाच ठाऊक. मुलगा चांगल्या गुणांनी उर्तीर्ण झाला. त्यांना त्याचा अत्यानंद झाला. त्याला पुढील शिक्षणाची सर्व जबाबदारी त्यांनी मुलावर श्री. शिवाजी जाधव (मामा) यांच्यावर सोपविली. मुलांवर अमूक एक कर असा कोणताही दबाव न आणता तुला काय करायचे याचा निर्णय तू व मामा घे असे त्यांनी निक्षून सांगितले. शिवाजी जाधव यांच्या संगतीत अशोक अधिक रमत आहे याची जाणीव त्यांना झालेली होती. त्यामुळे त्यांच्या दोघातील ''मामा-भाचे'' संबंधास त्यानी जाणीवपूर्वक मोकळीक दिली. हे नातेसंबंध पुढील काळात अधिक बहरतील याची त्यांनी सातत्याने दक्षता घेतली. पालकातील अत्यंत महत्वाचा गुण येथे आपणांस दिसतो प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा असल्याने अशोकने कला शाखेस प्रवेश घेण्याची मनिषा व्यक्त केली, वास्तविकपणे विद्यार्थ्याचा कल विज्ञान शाखेकडे असतानाही की बाब त्यास विरोधी होती त्यास त्यानी संमती दिली. पुढे त्यांने पदव्युत्तर शिक्षण मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागातून घेतले. तसेच त्याने शिक्षण शास्त्रातील पदवी संपादन केली. अधिकाधिक शिक्षण मुलाने घ्यावे यासाठी त्यांचा प्रयत्न होता. मुलांना नोकरीसाठी रत्नागिरीस

जाण्याचा निर्णय घेतला त्यास अनुमती दिली. अतिशय पुरोगामी विचाराने आण्णा प्रेरित होते.

मुलाने हुंडा न घेण्याचा निर्णय घेतला त्यास त्यांनी होकार दिला. वास्तविकपणे त्याच्या समकालीन समाजव्यवस्थेत हा विचार मान्य केला जात नसे. त्याच्या मित्रात किंवा नातेवाईकात ही बाब सहजपणे मान्य करणे अवघड होते. त्यांनी पत्नीस व नातेवाईकांना मुलाच्या कोणताही हुंडा न घेण्याच्या निर्णायाबरोबरच लग्न हे ''लग्न नोंदणी पद्धती'' करणे अधिक उचित कसे आहे हे पटवून देऊन, नोंदणी पद्धतीने विवाहास अनुमती दिली अशा प्रकारचा या पंचक्रोशीतील हा पहिलाच विवाह त्यामुळे लोकांना त्याविषयी विशेष आकर्षण होते. लग्न कसे धुमधडाक्यात केले पाहिजे त्यासाठी वेळेवर ऋण काढण्याची वेळ आली तरी चालेल असा विचार करणारी त्यांची पिढी, या वैचारिकतेस बगल देऊन त्यांनी नविन विचाराची कास धरली होती. कदाचित शिवाजी शिक्षण संस्थेत झालेल्या जडणघडणीचा परिणाम असावा. ३ नोव्हेंबर २००७ रोजी निवडक लोकांसोबत बीड येथील विवाह नोंदणी कार्यालयात जाऊन हा विवाह संपन्न झाला. भिवंडीतून या विवाहासाठी निवडक लोक म्हणजे अशोक पाटील (काका), अस्मिता चौधरी, समिधा पाटील, राजेश भाऊ, पाटील सर (जितेंद्र पाटील), युगांत व दिव्या इतकाच परिवार हजर होता. मात्र रुईतील बहुतांश लोक लग्नासाठी हजर होते. कु. मिरा (अंजली) महादेव वैद्य हिच्याशी विवाह झाला. सुनेवर त्यांचा विशेष जीव होता. सुनेला मदत करण्यात ते सदैव तत्पर असत. विशेषतः जेवणानंतर नळ येतात तेव्हा त्यांनी कधीही सुनेला पाणी भरण्यासाठी उठविले नाही. ते स्वतः पाणी भरत. खाण्यासाठी आवर्जून तिच्या आवडते पदार्थ आणीत. आपल्या सुनेस ते मुलीप्रमाणेच वागणूक देत. त्यामुळे सुन सासऱ्याचे चांगले मेतकूट जमले होते.

व्यक्तीच्या जीवनात रक्ताच्या नात्यापेक्षा मानलेली नाती अधिक प्रभाव टाकत असतात. कारण या नात्यात स्वार्थाचा लवलेश नसतो. येथे केवळ त्यागाची भावना अधिक प्रभावी असते. याच उक्तीची प्रचिती आपणांस

आण्णा व अस्मिता आणि समिधा यांच्या परस्पर संबंधांवरून दिसून येते. या दोघीवर त्यांनी मुलीसारखेच प्रेम केले. अस्मिता स्थानिक राजकारणात उतरल्यानंतर तिला मतदानासाठी कशी मदत होईल यासाठी त्यांची सतत धडपड असे. मतदारांनी तिला मतदान करावे यासाठी ते प्रयत्न करीत. तिच्या जमेच्या बाजू मतदारांना पटवून देत. तिला मतदान केल्याने आपल्या भागाचा विकास कसा होईल याचबरोबर तुमचा व्यक्तीगत फायदा कसा होईल हे त्यांना समजावून सांगत. आण्णाची खासियत म्हणजे ते दोघींशी बोलताना ते नेहमी आदरार्थी बोलत. त्यांच्या मतानुसार आपल्या व्यक्तींना आपणच मोठेपण देणे आवश्यक आहे हे मोठे पण आपण न दिल्यास, इतर लोकही त्या व्यक्तीस मोठेपण देत नाहीत. मुलाविषयी असणाऱ्या तक्रारी या दोघीना ते बिनदिकतपणे सांगत. त्यांना याची पूर्ण जाणीव होती की, या दोघींनी केलेल्या तक्रारीचा कधीही गैरफायदा घेणार नाहीत. बापलेकातील संबंध अधिक बळकट करण्यासाठीच त्या प्रयत्नशील असतील असे त्यांना वाटत होते. अस्मितामध्ये क्षमता व संधी असतानाही, स्थानिक राजकारणात २० वर्ष असूनही तिला काही अपरिहार्य कारणास्तव प्रभाग समितीचे सभापतीपद मिळाले नाही याची त्यांना नेहमीच खंत बोलून दाखविली होती.

मूळ गावातील अनेकांचे मुंबईतील आश्रयस्थान म्हणजे पांडुरंग असे. श्री. रविंद्र धर्माधिकारी (पिलूकाका) हे मुंबईला आल्यानंतर हमखास आण्णाला संपर्क करीत. ९० च्या दशकातील उत्तरार्धात शिवसेनेचे उपजिल्हा प्रमुख म्हणून कार्य करीत होते. त्यांनी चांगला समाजकारणात जम बसविला होता. आपल्या परिसरातील लोकांची कामे ते मंत्रालयात किंवा सेनाभवनात करण्यासाठी येत आशा वेळी पांडुरंग वेळातवेळ काढून त्यांच्या सोबत जात असे. मुक्कामास आण्णाकडे येत गावातील लोकांविषयी त्यांना विशेष आपुलकी होती. रविंद्र धर्माधिकारी (पिलूकाका) केवळ अल्पसंख्याक समाजातील असल्याने त्यांनी भुम-परांडा मतदारसंघातून विधानसभेची उमेदवारी स्वीकारली नाही याची खंत आण्णाला शेवटपर्यंत राहिली. सन

१९९० च्या विधानसभेच्या पंचवार्षिक निवडणुकीत शिवसेनेचा उमेदवार निवडून आला. आपल्या गावाचा विकास होण्यातील मोठी संधी चुकली असे त्यांना नेहमी वाटत असे. त्यावर पिलूकाकाचे असे मत होते की, आपल्याकडे नेतृत्व करण्याची क्षमता असून उपयोग काय ? आपल्या भागाचे प्रतिनिधित्व विधानसभेत करण्याचे भाग्य नव्हते. अशी संधी वारंवार उपलब्ध होत नाही याची त्यांना नेहमीच खंत राहीली. गावातील अनेकांशी आण्णाचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यात रामहारी नाना, त्र्यंबक सुबूगडे, भास्कर घुले इ. यांचा उल्लेख करता येईल.

चित्रा बाजीराव कवडे, ही आण्णाची धाकटी बहीण. तिचा आण्णावर व आण्णाचा तिच्यावर विशेष जीव. वडिलांना न सांगता त्यांनी तिच्या लग्नाची सर्व जबाबदारी उचलली. दोघांचा एकमेकांवर शेवटपर्यंत लोभ राहिला. वडिलांच्या मृत्यूनंतर पांडुरंगने कोणतीही बहीणा भावाच्या नात्यात अंतर येऊ दिले नाही. त्याकरिता प्रसंगी त्याने आपल्या कुटुंबाकडे दुर्लक्ष केले. मूळ गावी गेल्यानंतर ते आवर्जून चित्राकडे जात तिच्या मुलाबाळासोबत रमत. तिला शेतीच्या कामात मदत करीत. तिच्या सासू, नणंदा, भाचे या सर्वांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. बाजीराव कवडे यांच्याशी त्यांचे मित्रत्वाचे संबंध होते. कोणत्याही नातेवाईकांकडे सुखदुःखात जाण्यासाठी दोघांची जोडी तयारी असे. दोघांचा सुर जुळण्याचा समान धागा म्हणजे मांसाहार व मद्यप्राशन करणे हा होय. एकमेकांना दोघांचा फार आधार वाटत असे. दोघेही एकमेकांच्या सहवासात चांगलेच रमत. एकमेकांची सुख दुःख एकमेकांना सांगत.

मूळ गावी गेल्यानंतर चित्राला भेटण्यासाठी आवर्जून जात असत. तिच्या घरी आठ आठ दिवस राहत असत. तिला शेतीत काम करण्यासाठी मदत करीत असत. चित्राचे शिक्षण जास्त केवळ ७ वी पर्यंतच होते. केवळ घरच्या गरिबीमुळे तिला शिकता आले नाही. इतर मुलींप्रमाणे लवकर लग्न झाल्याने तिचे शिक्षण थांबविण्यात आले. मुलाप्रमाणे तिला शिकविण्याची जोखिम / धोका घेण्यास बप्पासाहेब तयार नव्हते. बौद्धिक क्षमता चांगली

असूनही तिला आपले शिक्षण मध्येच सोडून द्यावे लागले. परंतु तत्कालीन परिस्थितीचा व सामाजिक स्थितीचा विचार करता मुलींना शिकविण्याएवजी प्रत्येक पित्याचा, तिचे लग्न लावून तिला संसारात मार्गी लावण्याकडे कल असलेला दिसतो. जेणे करून आपल्यावर असलेली जबाबदारी इतर पुरूषावर ही जबाबादारी दिले की, आपण मुक्तपणे विनाजबाबदारी / बिनधास्त आपले जीवन जगण्यास रिकामे ही धारणा झालेली दिसून येते. सामाजिक अभिसरणास अजून सुरूवात झालेली नव्हती. ती प्रगल्भता लोकांमध्ये येण्यास सुरूवात झालेली नव्हती. त्यामुळे अनेक मुली आपली बौद्धिक क्षमता असूनही केवळ संधी न मिळाल्याने आपली उन्नती करू शकल्या नाहीत. त्यांनी आपल्या शैक्षणिक प्रगतीचा आपल्या कुटुंबाच्या व समाजाच्या तथाकथीत प्रतिष्ठेसाठी त्याग केल्याची अनेक उदाहरणे आपणांस दिसतील. त्याच व्यवस्थेचा एक बळी म्हणून चित्राचा उल्लेख आपणांस करता येईल.

तुळजीरामविषयी त्यांना पुत्रवत प्रेम होते. आपल्या मुलापेक्षा एक वर्ष लहान असलेल्या भावास ते मुलाप्रमाणे प्रेम करीत. आपल्या भांवडाचा अधिकाधिक उत्कर्ष व्हावा याकडे त्यांचा कल होता. दिवाळीस गावी गेल्यानंतर ते आपल्या मुलाप्रमाणे कपडेलत्ते त्याला घेत. त्याचबरोबर त्याने अभ्यासाकडे लक्ष द्यावे यासाठी त्याला सतत प्रोत्साहित करीत.

⅄ ⅄ ⅄

# भाग

चित्राच्या घरून फोन आला की, आण्णाच्या कानाजवळ गाठ आली आहे. मनात शंकेची पाल चुकचुकली काय, कसली गाठ असेल. जास्त त्रास तर होत नसेल ना? कोण सांगितले की गालफुगी आहे, कमी होईल. चुना वेचण्याचा दिवस झाल्याशिवाय निघता येत नाही, तेव्हा कसे निघायचे? अनेक वर्षापासून असलेली प्रथा व श्रद्धा या विवंचनेत तो होता. चैत्री पुर्णिमेला येडाईची जत्रा असते. हा परिसरातील मोठ्या उत्सवापैकी एक उत्सव असून यात अधिकाधिक लोकांचा सहभागी कल असतो. येडाई म्हणजे या भागातील लोकांचे दैवत. ती तुळजाभवानीची धाकटी बहीण आहे. त्यामुळे तिचा मान तुळजापुरच्या भवानी आई इतकाच किंबहुना कांकणभर अधिकच. या जत्रेला कोणत्याही परिस्थितीत जायचे हा आण्णाचा निर्धार पक्का असायचा. मुलाने जाण्यासाठी पैसे देवोत अगर न देवोत, उसनेपासने पैसे घ्यायचे व जत्रेला जायचे हा त्यांचा गेल्या चार/पाच वर्षातील कित्ता झाला होता. मुलगा काळजीपोटी खर्चासाठी पैसे द्यायला तयार नसे. परंतु पत्नीने मध्यस्थी केल्यास आपणांस जाण्यास पैसे मिळतात किंवा उसने घेतलेले पैसे कोणतीही कुरकुर न करता मुलगा देतो याची जाणीव त्यांना झाली होती. भिवंडीला आल्यानंतर मुलाने सांगितले की, आपण तातडीने टाटा मेमोरीयल हॉस्पीटलमध्ये जाऊन गाठीची खात्री करू देशातील सर्वोत्तम उपचार येथे मिळतात. देशभरातून अनेक ठिकाणाहूनच नव्हे तर जगभरातून कर्करोगाचे रुग्ण येथे उपचारासाठी येतात याची माहिती होती. गेल्या ४० वर्ष धुम्रपानाची सवय असल्याने कर्करोगाची गाठ असू शकते हा तर्क करण्यासाठी वैद्यकिय क्षेत्रातील तज्ज्ञ असण्याची आवश्यकता नव्हती. भिवंडीतील खाजगी रुग्णालयात दाखल होण्याचा निर्णय आण्णांनी घेतला. त्यानुसार सीटीझन रुग्णालयात दाखल झाले. डॉ. पटेल यांनी आण्णा रुग्णालयात दाखल झाल्यानंतर वेगवेगळ्या प्रकारच्या चाचण्या घेतल्या. पण कोणत्याही बाबीचे निदान होत नव्हते. तसेच गाठ कमी होत

नव्हती. डॉक्टरांनाही काय करावे हे लक्षात येत नव्हते. त्यांनी बायोप्सी, इंडोस्कोपी, स्कॅनिंग इ. प्राथमिक तपासण्या केल्या पण उपचारास काही प्रतीसाद येत नव्हता. गाठ काही केल्याने कमी होत नव्हती.

डॉ. पटेल यांनी सुचविले की, आपण डॉ. राजदेरकरांचे कान, नाक, घसा तज्ञांचे मत घेऊ तत्पूर्वी गळ्याचा एम.आर.आय काढू त्यासाठी पत्नीला घेऊन ते निदान डायग्नोस्टीक्स मध्ये गेले. वैद्यकीय अहवालात काही निश्चित निदान होत नव्हते. ईएनटी यांनी पूर्ण तपासणी केली. मनात घालमेल सुरू होती. काय निदान होणार? मुलगा अशोक त्याच्या विद्यापीठातील मित्र डॉ. अशोक फर्डे, डॉ. एम.एस. शेख, प्रसन्ना चव्हाण (वाहक) यांच्या सोबत हजर होते. राजदेरकरांचा सुर थोडा चिंताजनक वाटला. त्यांनी पेट स्कॅन करण्याचे सुचविले बाह्य लक्षणांवरून त्यांनी सांगितले होते की, ही सर्व लक्षणे कर्करोगाची दिसून येतात अशी कल्पना दिली. कर्करोग ऐकताच मनात धस्स झाले. सिगारेट ओढू नका, नका हे वारंवार सांगून देखील न ऐकल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असे सातत्याने वाटू लागले. मन घट्ट करण्याचा सल्ला मित्रांनी दिला. येणाऱ्या परिस्थितीस सामोरे जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. पण तरीही कठीण परिस्थिती आपणांस मानसिक धीर देण्यासाठी मित्रांचा आधार मोलाचा वाटतो. घरातील प्रमुख व्यक्तीच आजारी असल्याने घरातील इतर सदस्यांना धीर देऊन स्वतःला स्थिर ठेवण्यासाठी हितचिंतक आवश्यक असतात. त्यात अग्र क्रमांकाने अस्मिता चौधरीचा उल्लेख करता येईल. संकटाच्या काळात हमखास पाठीमागे उभी राहून योग्य सल्ला देणारी व्यक्ती (बहिण) म्हणून तिचा उल्लेख करिता येईल. तिने सांगितले की, आपणांस सर्व प्रकारचे उपचार करायचे.

डॉ. पटेल यांनी सोमय्या रुग्णालयात जाऊन डॉ. धैर्यशील सावंत, अळूशल्य तज्ञ (Onco surgoen) यांना भेटण्यासाठी सल्ला व शिफारस पत्र दिले. ते पत्र घेऊन दुसऱ्यास दिवशी हजर झालो. त्यांनी पुन्हा काही तपासण्या करण्याची शिफारस केली पुढील दोन दिवसात त्या तपासण्या करून घेतल्या त्याचबरोबर ''पेट स्कॅन'' ही विषेश तपासणी ऐरोली येथील

केंद्रात जाऊन करून घेण्यास सांगितले. याकरिता त्यांनी त्यांचे सहाय्यक श्री. विक्रम यांना भेटण्यास सांगितले.

डॉक्टरच्या सूचनेनुसार सर्व बाबी करावयाच्या होत्या. आण्णांनी सकाळीच गोविंदा यांना रिक्षा घेऊन जाण्याचे सांगितले. सकाळी ८.०० वेळ ''न्यूक्लिअर पेट'' केंद्रात पोहचायचे होते. केवळ तपासणी आम्ही दोघेच जाऊ तुझी सोबत येण्याची आवश्यकता नाही तू आपल्या कामावर जा. सकाळी काही न खाता त्या ठिकाणी हजर व्हायाचे होते. डॉक्टरांनी तपासणी करण्यासाठी आतील दालनात बोलाविले. तेथे साधारणतः २ तास लागले. पुढील आठ दिवसांनी रिपोर्ट येणार होता. काही तरी चमत्कार व्हावा व कर्करोगाची तपासणी नकारात्मक यावी असे वाटत होते. रिपोर्ट आला तो घेऊन येणासाठी सिंगला पाठविले. त्याने रिपोर्ट घेतला. तो ईमेल करून त्याची प्रिंट आऊट घेऊन डॉ. राजदेरकरांना भेटण्यासाठी गेलो. पण शरीरावर सतत अन्याय केल्याचा परिणाम काय होणार जे होऊ नये असे वाटत होते तेच झाले. लंग्जला बाधा झाली होती व तिचा दुय्यम परिणाम म्हणून गळ्याच्या वर कानाजवळ गाठ आली होती.

संकटास सामोरे जाण्याशिवाय पर्याय हाताशी काही नव्हता. दुसऱ्या दिवशी रुग्णालयात जाऊन डॉ. धैर्यशील सावंत यांना जाऊन भेटलो. त्यांनी घाबरण्याचे काही कारण नाही. केवळ ओषधोपचारावर उपचार होतील कुठल्याही शस्त्रक्रियेची गरज नाही असे सांगितले. थोडासा दिलासा वाटला. त्यांनी बेल मारून शिपायास बोलाविले. डॉ. पेंढारकर (Oncologist) आहेत का ? असे विचारले, शिपायांने सांगितले की, ते नुकतेच बाहेर गेल्याचे सांगितले. त्यांनी पुन्हा सांगितले की, त्यांचे सहाय्यक डॉ. सुहास आंग्रे (Oncologist) आहेत का? त्यांनी डॉ. सुहास आग्रे यांना बोलविण्यास सांगितले.

डॉ. सुहास आग्रे यांनी आण्णांना त्यांच्या दालनात बोलविले. सर्व अहवाल शांतपणे पाहिले व सांगितले की, काही प्रॉब्लेम नाही? गाठ टणक आहे पण कमी होईल. आपण उपचार सुरू करू या. मी विचारले कोणती औषधी द्यावी लागतील ती लिहून द्या. त्यांनी सांगितले की,

त्यासाठी रुग्णालयात दाखल व्हावे लागेल. आपण त्यांना ‘‘केमोथेरपी’’ देणार आहोत. पुस्तकात वाचलेला शब्द कानावर पडला. त्याचा काय त्रास होतो का ? डोक्याचे, भुवईवरचे, पापण्याचे, अंगावरचे केस जातात. उलटी आल्यासारखे वाटते. थोडासा ताप येतो. जेवण बेचव लागते. हीच उपचार पद्धती जगभर वापरली जाते. साधारणतः किती केमोथेरपी द्याव्या लागतील विचारल्यानंतर ३ ते ६ असे उत्तर त्यांनी दिले. खर्चाचा अंदाज विचारला तेव्हा त्यांनी सांगितले की, आपण विक्रम यांना भेटावे ते आपणांस अंदाजित खर्च सांगतील. विक्रम यांनी तपशीलवार माहिती दिली. त्यांनी सांगितले की, कम्फर्ट, सेमी डीलक्स, डीलक्स व स्वीट असे स्तर आहेत. प्रत्येक स्तरात साधारणातः २५ टक्केनी वाढ होते. आम्ही डॉ. सुहास आंग्रे यांना सांगितले की, आम्ही उद्या सकाळी पैशाचा बंदोबस्त करून दाखल होतो असे सांगितले. वास्तविकपणे आम्हास दुसरे मत (second opinion) घेण्यासाठी अवधी हवा होता.

घरी गेल्यानंतर डॉ. महेश सांळुखे व डॉ. शुभांगी वैद्य यांच्याशी सविस्तर चर्चा केली. काय करावे कसे करावे ? या उपचारा दरम्यान अनेक शंकाचे निराकरणासाठी हक्काचा माणूस म्हणून सल्ला घेतला. त्यांनी देखील कोणतीही कुरकूर न करता तो सल्ला दिला व निर्णय घेण्यात मदत केली. त्यांनी टीएमए मध्ये घेऊन जाण्याचा पर्याय देखील सुचविला परंतु टीएमए गर्दी पाहता तेथे रुग्णांचे लवकर मानसिक खच्चीकरण होते हे सांगितले. शेवटी सोमय्या आयुर्विहार व कॅंसर संशोधन केंद्रात उपचार घेण्याचे निश्चित केले. ते तात्काळ रुग्णालयात डॉ. आंग्रे यांना भेटण्यासाठी आले. त्यांनी डॉक्टरांशी सविस्तर चर्चा केली. त्यांची खात्री झाली की, आपण योग्य ठिकाणी उपचार घेत आहोत. डॉ. आंग्रे व डॉ. महेश साळुंखे एकाच महाविद्यालयातून म्हणजे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद येथून शिक्षण घेतलेले निघाले. डॉ. महेश यांनी निघताना वाक्य उचारले की, ‘‘Our patient is in safe hand’’ या वाक्याने धीर आला. सोमय्या रुग्णालयात आण्णांना उपचार करण्याचे निश्चित केले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ३ दिवसांसाठी रुग्णालयात दाखल होण्यासाठी हजर झालो. आम्हा सर्वांना दडपण आले होते की, उपचारपद्धती त्यांच्या शरीरावर जुळणार की नाही ? काही Reaction तर येणार नाही ना? केमोथेरपीसाठी औषधाची मात्रा (डोस) निश्चित केली होती. तो इंजेक्शन द्वारे शरीरात सोडला जातो. दिवसभर औषध दिली जातात. रात्री रुग्णास आराम दिला जातो. कम्पर्ट वार्डातील ४८५० क्रमांकाचा बेड दिला हाचा पुढील सर्व काळात रुग्णालयात दाखल केल्यानंतर मिळावा ही त्यांची अपेक्षा असे. पण उपचार पद्धती जुळली कोणतीही अडचण आली नाही. सर्वांना हायसे वाटले. गाठ कमी होत आहे. त्यांनी दुसऱ्या दिवशी सांगण्यास सुरूवात केली. ही चांगली बातमी होती. तीन दिवसाचे उपचार घेऊन घरी आल्यानंतर त्यांनी सांगितले डॉक्टर हुशार व छान आहेत. रात्री सोबत कोणी राहायचे यासाठी त्यांना पत्नीचीच सोबत लागत असे मग त्यासाठी तिला किती त्रास झाला तरी तो तिनेच सोसावा तो त्रास सोसण्यासाठी ती स्वःखुशीने तयार असे. रुग्णालयात दाखल करण्यासाठी बाई, मी व मिरा म्हणजे ताई दाखल झालो होतो. तीन दिवस रुग्णालयात ठेवल्यानंतर पुढील चक्र (Cycle) उपचाराकरिता २१ दिवसानंतर यावे असे डॉक्टरांनी सांगितले. त्यावेळी येताना रक्तातील CBC व हिमोग्लोबिन प्रमाण तपासून येण्याचे सांगितले.

घरी आल्यानंतर स्वारी खुशीत होती. चेहऱ्यावर आनंद दिसत होता. औषधोपचार वेळच्या वेळी घेणे सुरू होते. पाच दिवस विशेष काळजी घेण्याचे सुचविले होते. जेवणांच्या वेळा पाळल्या जात होत्या. त्यावर सुन व सासू विशेष लक्ष देऊन होत्या. जगात अनेक जणांना या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. व्यवस्थित औषधोपचार घेतल्यास परिणाम चांगला होताना दिसतो. त्यामुळे घाबरण्याचे काहीच कारण नाही. सदर बाबीत नेटवरून व तज्ज्ञांकडून माहिती घेतांना याची जाणीव होत होती की, फार काळ आण्णांचा सहवास लाभणार नाही. मनाची तयारी करणे गरजेचे आहे. या बाबत मी बोलता बोलता अस्मिताला याची कल्पना दिली की, आपल्या हातात

काही नसून उपचार घेत राहावे लागतील ते लागू पडले तर आपले नशीब. तिने पैशाची तयारी विचारली मी तिला सांगितले की, पैसे आहेत लागल्यास मागून घेईल. तिने सांगितले की, तुझा स्वभाव हा भिडस्त आहे. तू मला मागणार नाहीस त्यासाठी मी जिजी जवळ पैसे ठेवले आहेत. तुला लागल्यास निःसंकोचपणे तिच्याकडून मागून घे.

सकाळी लवकरच रुग्नालयात दाखल करण्यासाठी आलो तेव्हा उस्मानाबाद येथील श्री. पठाण आपल्या पत्नीला घेऊन आले होते. त्यांची ओळख झाली त्यांनी सांगितले की, हे अत्यंत चांगले रुग्णालय आहे येथे दर्जेदार उपचार दिले जातात असे सांगितले. त्यामुळे आपला निर्णय योग्य असल्याचे वाटले. २१ दिवसानंतर दुसऱ्या चक्रासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पुन्हा केमोथेरपीसाठी औषधाची मात्रा (डोस) निश्चित केली होती. तो इंजेक्शन द्वारे शरीरात सोडला जातो. दिवसभर औषध दिली जातात. रात्री रुग्णास आराम दिला जात असे. तीन दिवसाचे उपचार घेऊन घरी आल्यानंतर त्यांनी सांगितले. गाठ ५० टक्के कमी झाल्याचे दिसत होते. आम्हा सर्वांना हायसे वाटत होते. पुन्हा तिसरे चक्र २१ दिवसानंतर असल्याचे सांगितले. रुग्णालयातून घरी जाताना वाटायचे लवकरात लवकर आता २४ दिवसानंतर यावयाचे आहे. वेळ भरपूर आहे पण हे दिवस लवकर निघून जायचे. तिसऱ्या Cycle साठी ३ दिवसाचे उपचाराकरिता रुग्णालयात दाखल करण्यात आले. आता शेंगदाण्याच्या आकाराची गाठ शिल्लक राहिली होती. उपचाराना चांगला प्रतिसाद मिळत होता. ही जमेची बाजू होती आण्णा खुशीत होते. तीन दिवसांच्या केमोथेरपीनंतर त्यांना रुग्णालयातून सोडण्यात आले. त्यावेळी सांगितले की, आता २१ दिवसानंतर येताना पुन्हा ''पेट स्कॅन'' करून यायचे आहे. त्यामुळे उपचारांचा किती फायदा झाला हे ठरविता येईल व पुढील उपचाराचे धोरण ठरविता येईल असे सांगितले. बाह्य भागावरून तरी वाटत होते; चांगला परिणाम होत आहे. पेट स्कॅनचा रिपोर्ट देखील चांगला आला. दुसऱ्या दिवशी रुग्णालयात रिपोर्ट दाखविण्यासाठी डॉक्टर आंग्रेची वेळ मागून घेतली. रात्री

शंकर कवडे मावस भाऊ यांचा फोन आला की, दादा गेले (आबासाहेब कवडे) डॉक्टरांची वेळ राखीव असल्याने व पेट स्कॅनचा अहवाल दाखवून उपचाराची दिशा ठरवायची होती म्हणून रात्रीच वाशीला निघून वेळेत पोहचणे शक्य नसल्याने रात्री वाशीला गेलो नाहीत. हृदयविकाराच्या धक्क्याने त्यांचा मृत्यू झाला होता. स्वर्गीय आबासाहेब कवडे वयाने लहान होते ही बाब न पचणारी होती. त्यांनी आपली डॉक्टरांकडची आपली वेळ रद्द करण्यास सांगितली. आपल्या जवळची व्यक्ती गेली म्हटल्यावर आपल्यावरील उपचार तूर्तास बाजूला ठेवण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. आपल्या मेहुणीच्या दुःखात तिला गरज असताना, तेथे हजर राहणे त्यांना अधिक महत्त्वाचे त्यांना वाटत होते. साहजिकच कोणी गेल्यानंतर आपल्या तिथे गेल्याने ती व्यक्ती परत येणार नसते परंतु असणाऱ्या व्यक्तींना पुढील वाटचालीसाठी आधार मिळत असतो.

आबासाहेब कवडे हिराबाईचे यजमान ''अन्नमहामंडळातून'' स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर गावच्या वातावरणात रमणारी निर्मळ मनाची व्यक्ती. वाशी येथे शेतीत ते रममाण झाले होते. आबासाहेबांचे अकाली निधन मनाला चटका लावून जाणारे होते. रामई येथे कंदुरीचा (देवीला बोकड देण्याचा) कार्यक्रम होता. मराठवाड्यातील बहुतांश भागात शेतीच्या कामातून उसंत मिळाली की, असे कार्यक्रम केले जातात. सकाळीच शेतातील कामे मार्गी लावून ते रामई येथे दाखल झाले होते. त्यांनी मंदिराचा समोरील परिसर झाडून स्वच्छ केला. बकरे तोडण्यास मदत केली. स्वयंपाक बनविण्यास मदत केली. व्यवस्थित जेवण केले. भजन सुरू झाले तसे त्यांच्या छातीत दुखू लागले आहे अशी तक्रार त्यांनी केली. त्यावेळी शारिरीक ताण पडल्याने दुखत असे त्याना वाटले. त्यामुळे त्याकडे दुखण्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. पण छातीतील वेदना असह्य झाल्याने त्यांनी भावकीतील नितीन यास त्यांनी आपणांस दवाखान्यात न्यावे असे सांगितले. नितीनने त्याना दुचाकीवरून ग्रामीण रुग्णालय, वाशी येथे आणले. ग्रामीण रुग्णालयातील परिचारीका यांनी त्यांना सलाईन लावली व डॉक्टरला

बोलविण्यास गेल्या तोपर्यत त्यांना हृदयविकाराचा झटका आला व त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

निधनापूर्वी साधारणतः २ महिन्यापूर्वी ते आण्णाला पाहण्यासाठी भिवंडीला आले होते. त्यावेळी आण्णा व आबा याच्यात चांगल्या गप्पा झाल्या होत्या. नविन सुनबाईचे ते सातत्याने कौतुक करीत होते. शंकरची व स्वप्नाची जोडी चांगली आहे. शंकरच्या लग्नात सासरवाडीकडच्या लोकांनी चांगला पाहुणचार केला याची ते तोंड भरून स्तुती करीत होते. साडूसाडूंनी मनसोक्त गप्पा मारल्या. कोणास ठाऊक होतं ही त्यांची शेवटची भेट होती. नियतीच्या मनातील गूढ कोणासही जाणता येत नाही हे बरेच आहे अन्यथा माणसास जगता आले नसते. भविष्य व्यक्तीस आधीच कळाले असते तर, ''जगण्यातील निखळ आनंद त्यास उपभोगता आला नसता'' त्याला सतत पुढे होणाऱ्या घटनेची चिंता वाटत राहिली असती.

वाशीवरून आल्यावर त्याना पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावयाचे होते. गावावरून परत येताना रेल्वेने प्रवास, साडूचे अकाली जाणे, तसेच पावसाची रिपरिप सुरू होती. यात ते थोडे भिजले होते या बाबीमुळे मानसिक व शारिरीक ताणामुळे आण्णाना ताप आला होता. डॉक्टरांशी बोलून रुग्णालयात दाखल करणे दोन दिवस पुढे ढकलले. ताप कमी झाल्यानंतर रुग्णालयात आण्णाला केमोथेरपीसाठी दाखल करण्यात आले. गाठीचा शेवटचा थोडा भाग राहिला आहे तो जिरला की, उपचार पूर्णतः लागू पडले असे सर्वांना वाटत होते. उपचारास चांगला प्रतिसाद मिळत आहे असे डॉक्टरांचे मत होते. आम्हा सर्वांना हायसे वाटत होते. चौथी सायकल पूर्ण करून आण्णाला घरी नेण्यात आले. साडूच्या जाण्याची बाब मनाला लागली होती. ते पत्नीस म्हणाले देखील आता मला जगणे गरजेचे आहे, आपल्या कुटुंबियात मीच बुजूर्ग आहे.

दरम्यानच्या काळात गणपती व लक्ष्म्यांचा मोठा सण आला होता. आण्णांनी रुग्णालयात दाखल होण्यापूर्वी सजावटीची सर्व तयारी करून दिली. २९ ऑगस्टला २०१७ त्यांना रुग्णालयात केमोसाठी दाखल करण्यात

आले, घरी गणपती आल्याने बाई सकाळी आण्णांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर, घरी परत गेली. तिला नेहरूनगर येथून एस.टी. मध्ये बसवून दिले, पावसाने मुंबईत दमदार सुरुवात केली होती. सर्वत्र पाणीच पाणी झाले होते. बाई ११ वाजेपर्यंत घरी पोहचली होती. मी देखील कार्यालयात हजर झालो. माझे पूर्ण कपडे पाण्याने ओले झाले होते. आपत्कालीन व्यवस्थापनातील सवयीमुळे एक ड्रेस कार्यालयात ठेवल्याने मला कपडे बदलता आले. दुपार झाली तरी पावसाचा जोर काही कमी होत नव्हता. त्यातच समुद्रात भरती असल्याने पावसाचे पाणी सखल भागात तुंबण्यास सुरुवात झाली होती. दुपारी सर्व कार्यालयातील कर्मचारी यांना खबरदारीची उपाययोजना म्हणून लवकर घरी सोडून देण्यात आले. मी व डॉ. एम. एस. शेख जेवण करून कार्यालयाच्या बाहेर पडलो. तर इमारतीखाली प्रा. गिते यांची भेट झाली. त्यांनी मुख्य रस्त्यापर्यंत त्यांच्या गाडीतून सोडले. विचार केला पटकन बस मिळाली तर कुर्ल्यापर्यंत जाऊन पुढे जाता येईल व तेथून लोकल रेल्वे बंद होण्यापूर्वी ठाण्यापर्यंत गेल्यास घरी जाण्यात कोणतीच अडचण येणार नाही. पण बस मिळाली नाही कसे तरी दमदाटी करून एयर इंडियाच्या बसमध्ये बसलो. २ कि.मि. प्रवासासाठी आम्हाला ३ तास लागले. परंतु आम्ही कुर्ला स्टेशन पर्यत पोहचू शकलो नाही. मध्येच शहीद मेजर कौस्तुभ उड्डान पुलांवर आम्ही दोघेही उतरलो. कारण कमरे इतके पाणी रस्त्यात साठले होते. त्यामुळे वाहन चालक बस पुढे घेऊन जाण्यास तयार नव्हता. असे केल्यास गाडी पाण्यात अडकण्याची शक्यता अधिक होती. थोडे पुढे चालत गेल्यानंतर पाणी कमी झाले होते. एका रिक्षा वाल्यास विनंती केली असता पुन्हा त्यांने अर्धा किमीपर्यंत सोडले. त्यास एक तास लागला. लोकांचे जथ्थेच्या जथ्थे उड्डाण पुलावर अडकले होते. लोक तुंबलेल्या पाण्यातून वाट काढण्याचा प्रयत्न करीत होते. निसर्गाने पुन्हा आपले रौद्ररुप दाखविले होते. मी, एका गाडी नंबर प्लेटवरून (MH 12) अंदाज बांधला की, ही गाडी पुण्याला जाणारी असावी. त्यातील चालकास विनंती केल्यानंतर तो शेखसरांना पुण्यापर्यंत घेऊन जाण्यास

तयार झाला. मी कुर्ला नेहरू नगर किंवा पूर्वदुतगती मार्गापर्यंत जाण्याचा निर्णय घेतला. पाण्यातून मार्ग काढीत नेहरूनगर बस स्थानाकाकडे जात होतो. पण स्थानकाच्या सर्व बाजूने पाणी साचल्याने आतल्या गाड्या आतच व बाहेरील गाड्या बाहेर अडकल्या होत्या. सर्वत्र गाड्या अडकल्या होत्या त्यामुळे लोकांना पुढे जाता येत नव्हते. मी, निर्णय घेतला की, सोमय्या रुग्णालयात आण्णासोबत थांबायचे असे ठरविले. त्यानुसार दवाखान्यात जाण्यासाठी निघालो. एका बेस्टच्या बसमध्ये बसलो. त्याने मुख्य रस्त्यावर सोडले. रुग्णालयाच्या आसपास कमरे इतके पाणी होते. सावकाश त्या पाण्यातून चाचपडत चालवत रात्री ११.०० च्या सुमारास रुग्णालयात पोहचलो. अंगातले सर्व कपडे भिजले होते. त्यामुळे फार थंडी वाजत होती. भरीसभर रुग्णालयात वातानुकुलित यंत्रणा होती. प्रथमतः आण्णाची पँट व सदरा घातला त्यामुळे शरिरात थोडी ऊब निर्माण झाली. कँटीनमध्ये खाण्यासाठी काही मिळते का पाहिले तेथील लोकांनी केवळ दालखिचडी आहे असे सांगितले. पाण्यातून चालून चांगलीच भूक लागली होती त्यामुळे कॅटीन बंद होण्यापूर्वी जेवण करून घेतले. आण्णांच्या शेजारच्या बेडवर रुग्ण नसल्याने ते रिकामेच होते. रात्रपाळीच्या सिस्टरला विनंती करून त्या रिकाम्या बेडवर झोपलो. शेजारी सर्व रुग्ण असल्याने तो अनुभव वेगळाच होता. शरीर थकले होते. त्यामुळे आजुबाजूला आवाज येत असले तरी झोप लागली. सकाळी पाऊस थांबला होता. रुग्णालयाच्या आसपासचे पाणी ओसरले होते. नेहरूनगर बस स्थानकात गेलो. भिवंडीची बस लागलेली होती. पावसाने विस्कळीत केलेले जनजीवन पूर्वपदावर येण्यास सुरूवात झाली होती.

केमोथेरपीचे पाचवी व सहावी सायकल पूर्ण करूनही गाठ कमी होण्या एवजी वाढताना दिसायला लागली होती. ही बाब गंभीर होती. याचा अर्थ आजार उपचारांना प्रतिसाद देत नसून त्याने आपला प्रतिहल्ला चढविण्यास सुरुवात केली होती. केमोथेरपीचे सातवी व आठवी सायकल पूर्ण करूनही उतार पडत नव्हता. त्यामुळे उपचाराची दिशा बदलून फरक

पडतो का हे पाहण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला होता. त्यासाठी त्यांनी टीएमअे मध्ये जाऊन डॉ. राहुल परघणे, रेडीयोलॉजिस्ट यांचे मत घेण्याचे सुचविले. त्यासाठी त्यांनी ''रडार डॉपलर'' नावाची चाचणी घेण्याचे सुचविले. सुदैवाने ही तपासणी डॉ. परघणे यांनी तातडीने करून घेतली पण रेडीयेशनसाठी ती गाठ सुयोग्य नाही असे त्यांचे मत ठरले. त्यानंतर येऊन डॉ. सुहास यांना रिपोर्ट दाखविले. त्यांनी शस्त्रक्रिया करून गाठ काठण्याचा सल्ला दिला त्यासाठी त्यांनी डॉ. धैर्यशील सावंत यांचे मत घेण्याचे सुचविले. त्यांनी शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. घरी जाऊन डॉ. महेश साळुंखे यांच्याशी चर्चा केल्यानंतर शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला त्यामुळे तातडीने पैशाची जमवाजमव करणे गरजेचे होते. १३ नोव्हेंबर २०१७ रोजी शस्त्रक्रिया करण्याचे ठरले. आदल्या दिवशी रुग्णालयात आण्णांना दाखल करण्यात आले. त्यांच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. रात्री बाईचा फोन आला की, ''बर्गरने सांगितले आहे की, सकाळी आठ वाजता शस्त्रक्रिया करण्याची वेळ ठरलेली आहे. (बाई ब्रदरला बर्गर म्हणत असे) शस्त्रक्रिया दरम्यान रक्ताची आवश्यकता लागू शकते त्याकरिता पूर्व तयारी म्हणून ४ बॅग रक्त लागेल त्याची सोय करावी'' रक्त गट बी निगेटीव आहे. रात्री रक्ताची सोय करणे अवघड होते. त्यात सांगितलेला गट दुर्मिळ गट होता. अनेक रक्तपेढीत फोन लावूनही रक्त मिळत नव्हते. तिकडे डॉ. साळुंखे दाम्पत्य देखील रक्त मिळते का याची चाचपणी करीत होते. सकाळी बाईच्या सोबत ताईही दाखल झाली. दोघी एकमेकींना आधार देत बसल्या होत्या. सकाळी पुन्हा रक्त मिळविण्याची मोहीम सुरू केली. मोठ्या मुश्किलीने २ बॅग कशाबशा उपलब्ध झाल्या. डॉक्टरांना अडचण सांगितली. त्यांनी पुन्हा प्रयत्न करण्यास सांगितले. के.ई.एम रुग्णालयात संपर्क केला. त्यांनी सांगितले हे रक्त उपलब्ध नाही. इंटरनेटवरील एका स्वयंसेवी संस्थेशी (एनजीओ) रक्त उपलब्ध करून देतो असे सांगितले. लागलीच डॉक्टरांना त्याची कल्पना दिली. त्यांनी निरोप दिला की, रक्ताची आवश्यकता नाही आपणांकडे रक्त मिळाले आहे. सोमाय्यामध्ये जाऊन चौकशी केली तेव्हा

समजले की, आण्णांचा रक्तगट बी - पॉझीटीव्ह आहे. सदर चूक न कळतपणे रात्री ब्रदर कडून झालेली आहे. अतिशय मनस्ताप झाला पण ही रागवण्याची वेळ नव्हती. शस्त्रक्रियेस सुरुवात झालेली होती. आमची प्रेरुममध्ये घालमेल सुरू होती. ४ तास शस्त्रक्रिया चालली ती व्यवस्थित झाली असे डॉक्टरांनी सांगितले. गाठीचा मासाचा पावाच्या आकाराचा तुकडा डॉक्टारांनी दाखविला. आम्हा तिघांनाही हायेसे वाटले. आण्णांना शुद्ध नव्हती. आम्हा तिघांनाही आळीपाळीने त्यांना आयसीयू मध्ये त्यांना लांबून दाखविले. रात्री त्याच्या सोबत बाई नेहमीप्रमाणे थांबली. तिने अनेक रात्री जागून काढल्या होत्या. ही रात्रही तिला जागूनच काढायची होती. सकाळी त्यांना शुद्ध आली तरी निरीक्षणासाठी (देखरेखीखाली) आयसीयू मध्ये ठेवण्यात आले. दुसऱ्या दिवशी रात्री सामान्य कक्षात स्थालांतरीत करण्यात आले. त्यांना वाटत होते आता काही अडचण नाही. जिजी त्यांना भेटण्यासाठी गेली असता तिला ते म्हणाले, ''जिजी आता काही अडचण नाही माझी बिमारी सर्व निघाली'' रात्री आचानक ११.३० च्या सुमारास बाईचा फोन आला, आण्णांना अचानक चक्कर आली. त्यांना पुन्हा आयसीयू मध्ये शिफ्ट केले आहे, मी विचारले, दवाखान्यात येण्यासाठी निघू का? ती नको म्हणाली आवश्यकता असल्यास मी तुला सांगेन. पुन्हा १५ मिनिटांनी फोन केला काही अडचण नाही ते व्यवस्थित आहेत. दुसऱ्या दिवशी त्यांना पुन्हा साध्या वॉर्ड मध्ये शिफ्ट केले. १८ नोव्हेंबर २०१७ रोजी त्यांना डिस्चार्ज दिला. डॉक्टरांनी सांगितले आता ८ दिवसानंतर ड्रेसिंगसाठी या. त्यानंतर ड्रेनचा पाईप काढून टाकू. आठ दिवसात दुसरी आणखी एक गाठ त्या गाठीच्या खाली आली. त्यामुळे रोग बळावलेला दिसत होता. डॉक्टारांनी सल्ला दिला की, पुन्हा केमो देऊ पण त्यानेही गाठ कमी होईल की नाही हे निश्चित सांगता येत नाही. त्याचबरोबर त्यांना हे उपचार सहन होतात की नाही हे ही सांगता येत नाही. म्हणजेच आपण आपले प्रयत्न करायचे यश मिळण्याची शाश्वती दुर्मिळ होती. मनात अनेक विचारांचे काहूर निर्माण झाले होते पण बोलून दाखवायची चोरी होती.

कोणाशी बोलणार? घरातील जबाबदार व्यक्तीच आजारी होती. त्यांच्याशी बोलणे शक्य नव्हते; पण त्यांच्या नजरेतून मला जाणवत होते की, ''ते फार काळ राहू शकणार नाहीत याची त्यांना जाणीव झालेली आहे''. ते पत्नीला विचारतात, आता काय करणार आहात. कोणत्या डॉक्टरकडे घेऊन जाणार आहे ? बाई अतिशय संवेदनशील, हळवी व भावूक आहे. आपले पती आपल्या सोबत फार काळ राहणार नाहीत ही वस्तुस्थिती ती सहजासहजी स्वीकारण्यास तयार होणार नव्हती. त्यामुळे तिच्या समोर काही बोलण्याचा अर्थ नव्हता. तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करण्याची स्थिती होती.

आपण घेत असलेले निर्णय योग्य किंवा अयोग्य आहेत हे समजत नाहीत. पण आपल्या मनातील सल कोणास तरी सांगणे आवश्यक असते. बहुतांशी ही भूमिका श्री. अजय पाटील, श्री. शिवाजी जाधव, श्री. हणमंत जाधव, व सौ. अस्मिता राजेश चौधरी यांनी निभावली.

कानाजवळील दुसरी गाठ मोठी होत होती तर आधी शस्त्रक्रिया केलेल्या ठिकाणची जखम भरून येत नव्हती. त्यासाठी निरामय हॉस्पीटलमधून नियमितपणे २ परिचारिका येतील याची सोय अस्मिताने केली. त्यामुळे जखमेची व्यवस्थित निगा राखली जात होती. त्या परिचारिका देखील नियमितपणे येत होत्या. त्यांना आण्णा सांगत, ''सिस्टर माझी जखम फार दुखत आहे. मला फार वेदना होत आहेत त्या कमी होण्यासाठी मला गोळी द्या'' त्या सांगत आम्ही डॉक्टरांना विचारून औषध देऊ. सदर जखमेची काळजी घेतल्यानेच त्यांना काही प्रमाणात त्रास कमी होत होता. सर्व नातेवाईक त्यांना येऊन भेटून जात होते. त्यांना भेटण्यास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस चहा घेण्याची विनंती ते करीत होते. येणाऱ्या प्रत्येकाशी संवाद साधण्याचा त्यांचा प्रयत्न होता. तुळजीराम व चित्रा दोघीही आण्णांजवळ येऊन राहत होते. त्यामुळे त्यांच्या मनास उभारी आली होती. आण्णांना बोलताना धाप लागत होती तरी ते चित्राला सांगत तू बोल मी ऐकतो. जेवण त्यांना जात नव्हते. त्यांना फळांचा ज्युस बनवून द्यावा लागत होता.

हा ज्युस पत्नी (बा), सुन (अंजली), मुलगी (मिरा) व बहीण (चित्रा) तातडीने बनवून देत असत. चित्रा सांगत होती, मला गावी जायचे आहे तेव्हा तिला सांगत होते तू रहा. तूझ्या भेंडी व गवाराची काळजी करु नकोस. फक्त १० दिवस रहा मी तूला सोडण्यासाठी येतो. कदाचित त्यांना काही जाणीव झाली असावी.

''पालिवाल केअर'' म्हणजे आता वैद्यकीय उपायांना प्रतिसाद मिळत नाही तेव्हा रुग्णास कमीत कमी त्रास कसा होईल यासाठी प्रयत्न करणे थोडक्यात मृत्यूपूर्वी घ्यावयाची काळजी घेणे व मृत्यूची वाट पाहणे. माणूस सर्व प्रयत्न करून यश न मिळाल्यास तो रुग्णास उतार पडावा म्हणून काही करण्यास तयार होतो त्याच्या या मनस्थितीचा फायदा भोंदू बाबासारखे लोक घेतात.

श्री. शिवराम कदम यांनी डॉ. मनोज सोनवणे (तथाकथित डॉक्टर) यांचे नाव सुचविले. तेथे घेऊन जायचे ठरले. त्यांच्या गावात गेलो. राहत्या घरातच त्यांचा दवाखाना होता. दवाखान्यात १० ते १५ रुग्ण त्यांची वाट पाहत होते. दवाखान्यात कोणतीही पदवी लावलेली नव्हती. कोठेही त्यांच्या नावाची पाटी नव्हती. हे तथाकथित डॉक्टर होते. बुद्धी शंका घेत होती पण मन सांगत होते गुण आल्यास पदवीची काय आवश्यकता आहे. गुण आल्याशिवाय का येथे रुग्ण येतात. सकाळीच दोघे जाऊन पाहून आलो तर डॉक्टरांनी सांगितले माझ्याकडे लवकर घेऊन आला असतात तर मी नक्की इलाज केला असता आताही आपण प्रयत्न करू. त्यांने आशा पल्लवित केल्या वाटले जर ईलाज झाला तर चांगलेच प्रयत्न करण्यास काय हरकत आहे. दुपारी लागलीच त्यांना घेऊन डॉक्टरकडे घेऊन आलो. त्यांना अत्यंत अशक्तपणा आला होता. तरी इलाज होईल या आशेवर ते डॉक्टरकडे आले होते. त्यांनी आठ दिवसांची औषध दिली. घरी आल्यानंतर ती आण्णांना कशी द्यायची याची पद्धती घरच्या व्यक्तीना समजावून सांगितली. मनोमन देवाकडे प्रार्थना करीत होतो उपचार लागू पडावेत. त्यांना आराम

पडावा. त्याची इच्छाशक्तीही दांडगी होती. लागलीच त्यांनी औषध घेण्यास सुरूवात केली. घरात थोडे चैतन्य निर्माण झाले होते.

२८ डिसेंबर, २०१७ सकाळी नेहमी प्रमाणे आण्णांना विचारले की, कामासाठी कार्यालयात जाऊ का ? त्यांनी हातानी नकार दर्शविला. पण त्यांना वस्तूस्थिती सांगितली की, माझे सहकारी डॉ. एम. एस. शेख सुट्टीवर आहेत व वरिष्ठ डॉ. अशोक फर्डे आजारी असल्याने कामावर येतील याची खात्री नाही. सध्या परीक्षा सुरू आहेत. मी न गेल्यास महाविद्यालयात प्रश्नपत्रिका पाठविण्यास अडचण येऊ शकतात. त्यावर त्यांनी नाखुषीने हात हालवून जाण्यास अनुमती दर्शविली. मोठ्या जड मनाने विद्यापीठात जाण्यासाठी निघालो. कारण विद्यापीठाचा प्राधान्याने विचार करणे गरजे होते. ज्याच्यावर आपला उदरनिर्वाह चालतो ते महत्त्वपूर्ण आहे. हीच बाब मनावर बिंबलेली असल्याने इकडे आलो. डॉ. फर्डे सरांनी वडीलांची तब्येत कशी आहे हे विचारले असता सांगितले की काही फरक नाही. आपल्या हातात काही नाही ? आपण प्रयत्न केलेले आहेत यापुढे काही करू शकत नाही. जेवणानंतर कार्यालयातील दुसऱ्या दिवशीची तयारी सुरू केली. हस्तलिखीत विभागात वेळेत काम करणे अत्यंत महत्वाचे असते ती न केल्यास दुसऱ्या दिवशी परीक्षा घेणे शक्य होत नाही. दुपारी ४.०० च्या सुमारास सर्व कामे पार पाडून पुन्हा आपल्या दालनात आलो तर फोन आला. त्या फोनवर समोरुन चुलते बोलत होते, ''घराकडे निघून ये'' मी विचारले की लगेच निघू का? त्यांनी सांगितले की, लगेच निघ. याचा अर्थ माझ्या लक्षात आला की, काही तरी गंभीर बाब आहे. मी फर्डे सरांना फोन लावला. त्यांनी मिटींगमध्ये असल्याने फोन उचलला नाही. मी प्रसन्नाला गाडीसाठी फोन लावला. त्यांनी फोन उचलला नाही. तातडीने निघणे गरजेचे होते. कार्यालयातील दप्तरीला सूचना केली की, मी लवकर जात आहे. बॅग उचलली व खाली गेलो. पुन्हा फोन लावण्याचा प्रयत्न केला फोन लागत नव्हता. कल्पेश दळवी कार्यालयात आला आहे त्याच्या सोबत गाडी आहे असे मला कौशिक नाचणेने सांगितले तेव्हा मी कल्पेशला

विचारले की, लवकर गाडी घेऊन ये व मला ठाण्याला सोड. त्यांनी सांगितले की, सर २ मिनिटांत येतो. त्याच्या सोबत श्री. संदीप प्रभू होते त्यांनी सांगितले की, सर फक्त २ मिनिटाचे काम मला पतपेढीत आहे, आपण लगेच निघू मी सांगितले नाही मला लगेच निघायचे आहे ते दोघेही तयार झाले आम्ही भिवंडीच्या मार्गाने निघालो. मला लवकरात लवकर घरी पोहचायचे होते. मी गाडीत बसल्यावर मामांना फोन लावला तेव्हा त्यांनी सांगितले की, मी देखील कार्यालयातून निघालो आहे. याचा अर्थ माझ्या लक्षात आला. काय झाले असेल ? शांतपणे ये व परीस्थितीला सामोरे जाऊ या. घाबरू नकोस मी आहे? मी हणमंत जाधवला फोन लावला व त्याला कल्पना दिली की तू घरी जा ? डॉ. महेश साळुंखेचा फोन आला की, आम्ही सर्वजण भाईंदर वरून भिवंडीला जात आहोत तुम्ही घरी सावकाश या? पुन्हा मामांचा फोन आला की, आपण काय करायचे पार्थिव गावी न्यायचे की येथेच अंत्यसंस्कार करायचे. मी म्हटले, त्यांच्या जवळच्या दोन्ही व्यक्ती म्हणजे चित्रा कवडे (आत्या) व तुळजीराम घुले (चुलते) येथेच आहेत. त्यामुळे गावी नेण्यात काही अर्थ नाही. आम्ही कल्पेश, प्रभूसह तिघेजण घरी पोहचलो. आण्णा घरी नव्हते त्यांचा केवळ देहच तिथे होता. सकाळी नाखुशीने जाण्याच्या अनुमतीचा अर्थ मला आता उमगला होता.

▲ ▲ ▲

## ❊ शुभेच्छा ❊

श्री. अशोक घुले यांनी लिहिलेल्या या मौल्यवान पुस्तकाची प्रस्तावना लिहिताना मला खूप आनंद होत आहे. 'एका संघर्षाची गाथा...मराठवाड्यातील पोराची कथा' या पुस्तकात त्यांनी आपल्या वडीलांचे म्हणजे कै. पांडुरंग बाप्पासाहेब घुले यांची संसार कथा मांडली आहे.

आण्णांचा जन्म मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यातील 'रुई' नावाच्या एका छोट्याशा गावात झाला. येथे शिक्षणाची सोय नसल्याने आण्णांनी शहरात वसतिगृहात राहून शिक्षण घेतले. आण्णा वसतिगृहात राहून शिक्षण जरी पूर्ण करु शकले नाही, तरी त्यांच्यात धाडस, दुर्दम्य इच्छाशक्ती, सर्वांना एकत्र घेऊन पुढे जाणे, कठीण परिस्थितीत पुढे जाणे, असे काही गुण वाखाणण्यासारखे होते, जे त्यांना पुढील आयुष्यात कामी आलेत.

गावातील शेती सोडून जादुनगरीत (मुंबईत) आपले नशीब आजमावण्यास आले. काही काळ नोकरी करुन मग त्यांनी त्यांच्या प्रवृत्तीनुसार व्यवसाय सुरु करण्याची धडपड सुरु केली. व्यवसाय करताना कितीही अडचणी आल्या तरी त्याची झळ त्यांनी मुलांच्या शिक्षणावर पोहोचू दिली नाही. एवढेच नव्हे तर मुलांच्या मुक्त विचारांना देखील त्यांनी साथ दिली.

आण्णांनी आपल्या आयुष्यात अनेक उन-पाऊस बघितले, ते स्वत:च्या चुकांमधून शिकत गेले. उतार वयात त्यांना दुर्दैवाने कर्करोग जडला. त्यांनी आयुष्यात केलेल्या संघर्षातून आलेली सकारात्मक वृत्ती त्यांना कर्करोगाशी लढण्यात कामी आली.

श्री. अशोक घुले यांनी 'एका संघर्षाची गाथा...मराठवाड्यातील पोराची कथा' या पुस्तकात संघर्षमय जीवन प्रस्तुत केले आहे.

पुस्तकास माझ्या हार्दिक शुभेच्छा !

**- डॉ. राजन वेळूकर**
माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ

शारदा प्रकाशन

ISBN 978-81-89272-063